



# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष – २ रे ❑ अंक –२९७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. २४ डिसेंबर २०२४ ❑ संपादक – शुभांगी जोशी ❑ मुल्य – १ रु. ❑ पृष्ठ –६

## मोहन भागवत एका संघटनेचे प्रमुख हिंदू धर्माचे नाहीत; स्वामी रामभद्राचार्यांची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अयोध्या**

संभलमध्ये उत्खननात मंदिर सापडल्यानंतर देशात मंदिर–मशीद मुद्दा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. यावर बोलताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी प्रत्येक दिवशी मंदिर–मशिदीचा नवीन मुद्दा मांडला जात आहे. हे योग्य नाही, असे म्हटले होते. त्यावर स्वामी रामभद्राचार्य यांनी टीका केली आहे. ते एका संघटनेचे प्रमुख आहेत, हिंदू धर्माचे नाहीत, असे स्वामी भद्राचार्य म्हणाले.

'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांचे एक विधान चर्चेत आहे. मंदिर–मशीद मुद्दे जाणिवपूर्वक उपस्थित केले जात आहेत. सगळ्यांनी एकत्र राहायला हवे,' असा प्रश्न स्वामी भद्राचार्य यांना विचारण्यात आला होता.स्वामी भद्राचार्य म्हणाले, एकत्र झाले पाहिजे, पण आपले ऐतिहासिक स्थळ दुसऱ्याला



थोडी दिले पाहिजे. ही मोहन भागवत यांचे व्यक्तिगत भूमिका असू शकते. ही सगळ्यांची भूमिका नाहीये.

**मोहन भागवत हिंदू धर्माचे प्रमुख नाहीत –स्वामी भद्राचार्य**

मोहन भागवत हे कोणत्या एका संघटनेचे प्रमुख असू शकतात, ते हिंदू धर्माचे प्रमुख नाहीत. त्यामुळे त्यांचे म्हणणे आम्ही ऐकत नाही. ते आमचे अनुशासक नाहीत, आम्ही त्यांचे अनुशासक आहोत, अशी भूमिका स्वामी भद्राचार्य यांनी मांडली.

मी २० वेळा सांगतोय, ते हिंदू धर्म व्यवस्थेचे ठेकेदार नाहीत. हिंदू धर्म व्यवस्था हिंदू धर्माच्या आचार्यांच्या हातात आहे. त्यांच्या हाता नाहीये. ते कोणत्या एका संघटनेचे प्रमुख बनू शकतात, पण आमचे प्रमुख नाहीत. ते सगळ्या भारताचे प्रतिनिधी नाहीत, असे स्वामी रामभद्राचार्य म्हणाले.

**मोहन भागवतांचं विधान दुर्दैवी**

राम मंदिर उभारल्यानंतर काही लोकांना असं वाटतंय की ते नवीन जागांबद्दल असाच मुद्दा उचलून हिंदूंचे नेता बनू शकतात. हे स्विकारण्यासारखं नाही, असे मोहन भागवत म्हणाले होते.

त्याच्या या विधानाबद्दल स्वामी रामभद्राचार्य म्हणाले, त्यांचे हे विधान दुर्दैवी आहे. त्यांना काय मिळालं नाहीये. त्यांना सगळं काही मिळालं आहे. त्यांनी काहीही चांगलं म्हटलेलं नाही. हे खूप दुर्दैवी आहे.

## आंतरराष्ट्रीय ड्रग्ज तस्कर सुनील यादवची अमेरिकेत हत्या

### लॉरेन्स बिश्नोई गँगने घेतली हत्येची जबाबदारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४स्टॉकटोन**

आंतरराष्ट्रीय ड्रग्ज तस्कर सुनील यादव याची लॉरेन्स बिश्नोई गँगने गोळ्या घालून हत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अमेरिकेतली कॅलिफोर्निया येथे दोन दिवसांपूर्वी यादव याची हत्या करण्यात आली आहे.

स्टॉकटोन भागातील ६७०० ब्लॉक येथील घरात घुसून यादव याची हत्या करण्यात आली आहे. दरम्यान सोमवारी अमेरिकास्थित गोल्डी ब्रार आणि रोहित गोदारा यांनी सोशल मिडियाच्या माध्यमातून या हत्येची जबाबदारी स्वीकारली



आहे. ब्रारच्या फेसबुक पोस्टमध्ये लिहिले आहे की, सर्व भावांसाठी, मी, रोहित गोदारा आणि गोल्डी ब्रार, कॅलिफोर्नियामध्ये सुनील यादव उर्फ गोलीच्या हत्येची संपूर्ण जबाबदारी स्वीकारतो. आमचा प्रिय भाऊ अंकित भादू याचे एन्काउंटर घडवून आणण्यासाठी त्याने पंजाब पोलिसांशी हातमिळवणी केली. आम्ही त्याच्या मृत्यूचा बदला घेतला.

ब्रार याच्याकडून ज्या घरात यादव याची हत्या करण्यात आली त्या घराचा नंबर (६७०६) देखील देण्यात आला आहे. या पोस्टमध्ये पुढे सुनील यादव हा अंमली पदार्थांच्या व्यापारात गुंतलेला होता, तसेच पंजाब, हरियाणा आणि राजस्थान येथे अंमली पदार्थांचा पुरवठा करणे आणि पोलिसांशी संबंध असल्याचा आरोपही या पोस्टमध्ये करण्यात आला आहे. तसेच अंकित भादू एन्काउंटर प्रकरणात त्याचा सहभाग उघड झाल्यानंतर तो अमेरिकेत पळून गेल्याचा दावाही या पोस्टमध्ये करण्यात आला आहे.

## नवी दिल्ली विधानसभेसाठी काँग्रेसकडून तयारी सुरु

### निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच पहिली यादी येणार, मुख्यमंत्र्यांविरुद्ध उमेदवार ठरला?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २४नवी दिल्ली**

नवी दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं तयारी सुरु केली आहे. काँग्रेसच्या कार्यकारिणीच्या बैठकीत ३५ जागांबाबत चर्चा झाली असून २८ उमेदवारांची नावं निश्चित करण्यात आली असल्याची माहिती आहे. सूत्रांच्या माहितीनुसार मुख्यमंत्री अतिशी यांच्या समोर कालका विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसकडून अलका लांबा यांचं नाव निश्चित करण्यात आलं आहे. काँग्रेसनं कर्नाटक विधानसभा निवडणूक जाहीर होण्यापूर्वी उमेदवारांच्या नावांची घोषणा केली होती. तिथं त्यांना फायदा झाला होता. कर्नाटकमध्ये काँग्रेसला सत्ता मिळाली होती. ११ वर्षानंतर पुन्हा एकदा नवी दिल्लीत सत्ता मिळवण्यासाठी काँग्रेसनं प्रयत्न सुरु केली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार काँग्रेसनं सीमापुरीतून राजेश लिलोठिया, जंगपुरामधून फरहाद सुरी, मटिया महलमधून आसिम अहमद, बिजवासनमधून देवेंद्र सहरावत यांची नावं निश्चित



करण्यात आली आहेत. आसिम अहमद खान आणि देवेंद्र सहरावत हे आपचे माजी आमदार आहेत. दोन्ही नेत्यांनी सोमवारी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. आसिम अहमद खान यांना अरविंद केजरीवाल यांनी भ्रष्टाचाराच्या आरोपातून मंत्रिमंडळातून बाहेर काढलं होतं. तर, देवेंद्र सहरावत हे यापूर्वी भाजप आणि शिवसेनेत होते. आता ते काँग्रेसमध्ये दाखल झाले आहेत.

**काँग्रेसची जाहीरनाम्यासाठी बैठक**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं तयारी सुरु केली आहे. यावेळी दिल्लीत विजय मिळवायचा या इराद्यानं काँग्रेसनं तयारी सुरु केली असून पार्टीनं बुथ स्तरावर काम करण्यास सुरुवात केली आहे. काँग्रेसची दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी जाहीरनामा तयार करण्यासाठी बैठक सोमवारी पार पडली. या बैठकीत दिल्लीच्या काँग्रेस अध्यक्षांनी जी आश्वासनं आपण पूर्ण करु शकतो, त्याचा समावेश जाहीरनाम्यात करायला हवा, असं म्हटलं होतं.

दिल्लीत गेल्या २ विधानसभा निवडणुकीत काँग्रेसची कामगिरी समाधानकारक राहिली नाही. काँग्रेसला दोन्ही निवडणुकीमध्ये पराभव स्वीकारावा लागला. काँग्रेसचं नेतृत्त्व जागा वाटप आणि पक्षांतर्गत नाराजीवर लक्ष ठेवत असल्याची माहिती आहे. २८ डिसेंबरला राहुल गांधी उत्तर पूर्व दिल्लीतील सीमापुरी भागात सभेला संबोधित करणार आहेत.

## पालकमंत्रिपदासाठी शिरसाटांना भाजपचा तीव्र विरोध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४छत्रपती संभाजीनगर**

महायुतीच्या मंत्रिमंडळाचा विस्तार आणि त्यानंतरचं खातेवाटप नाराजीला कारणीभूत ठरलं आहे. काही आमदारांनी दबक्या आवाजात तर काही जणांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे. नव्या सरकारचं कामकाज सुरू झालं नाही तोच नाराजीचा स्पीड ब्रेकर आला आहे. महायुतीतील सर्वच पक्षांत नाराजी दिसून येत आहे. आताही शिवसेना भाजपात धुसफूस वाढल्याची बातमी मिळाली आहे. आता बस्स.. आणखी किती सहन करायचे असा सूर आळवत मंत्री संजय शिरसाट यांच्या नावाला विरोध करण्यात आला.



शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांना कॅबिनेट मंत्रिपद मिळालं आहे. भाजपाचे आमदार अतुल सावे देखील मंत्री झाले आहेत. हे दोन्ही मंत्री छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आहेत. त्यामुळे जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावरून दोघांत रस्सीखेंच सुरू झाली आहे. यातच पालकमंत्रिपदासाठी भाजप कार्यकर्त्यांनी संजय शिरसाट यांच्या नावाला तीव्र विरोध केला आहे.आपली ताकद जास्त असतानाही लोकसभा निवडणुकीत शिंदे गटाला जागा दिली. खासदार निवडूनही आणला. विधानसभेतही त्यांनाच जास्त जागा. तरी देखील त्यांचं काम केलं. आता पालकमंत्रीही त्यांचाच का? आता बस्स झालं आणखी किती सहन करायचं अशा शब्दांत भाजप कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. भारतीय जनता पक्षाच्या उस्मानपुरा येथील कार्यालयात सदस्य नोंदणी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीत पदाधिकारी चांगलेच आक्रमक झाल्याचे दिसले. पालकमंत्री पदासाठी संजय शिरसाट यांच्या नावाला विरोध करण्यात आला. मंत्री सावे हेच पालकमंत्री व्हावेत अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी केली. इतकेच नाही तर सावे हेच पालकमंत्री व्हावेत असा ठराव एकमताने घेण्यात आला. हा ठराव घेऊन कार्यकर्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे समजते.

जिल्ह्याचा पालकमंत्री मीच होणार असा दावा मंत्री संजय शिरसाट यांनी काही दिवसांपूर्वी केला होता. त्यानंतर अुतल सावे यांनी देखील आम्ही पालकमंत्रिपदासाठी मागणी केली आहे, असे सांगितले. या परस्पर विरोधी भूमिकांमुळे महायुतीत कुठेतरी अंतर्गत वाद सुरू असल्याच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. परंतु, नंतर पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत हा मुद्दा उघडपणे समोर आला.

आमचा कुणाच्याही नावाला विरोध नाही. मंत्री अतुल सावे यांना पालकमंत्रिपदाचा अनुभव आहे. शहरातील पाणीपुरवठा योजना, उद्योग, कंपन्या या सर्वात त्यांचा सहभाग होता. त्यामुळे आता हे सर्व प्रकल्प पुढे नेण्याच्या उद्देशाने सावे पालकमंत्री झाल्यास त्याचा नक्कीच फायदा होणार आहे, अशी प्रतिक्रिया भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष शिरीष बोराळकर यांनी दिली.

## आमच्याकडे मान अपमान मनात होतो अन्.., मुख्यमंत्री फडणवीसांच्या वक्तव्याने हास्यकल्लोळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४मुंबई**

महायुती सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार आणि खातेवाटपानंतर नाराजीची लाट उसळली आहे. काही आमदारांनी दबक्या आवाजात तर काही जणांनी थेट नाराजी व्यक्त केली आहे. यामध्ये छगन भुजबळ आघाडीवर आहेत. काल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही भेट घेतली. फडणवीसांनी आठ ते दहा दिवसांत योग्य मार्ग काढू असं आश्वासन त्यांना दिलं आहे. या घडामोडी घडत असतानाच आता देवेंद्र फडणवीसांचं एक वक्तव्य चांगलंच चर्चेत आलं आहे.

आमच्याकडे मान अपमान होतो,



त्याचं संगीत मीडियात वाजतं असं वक्तव्य त्यांनी केलं. निमित्त होतं संगीत मानापमान चित्रपट ट्रेलर लॉंचिंगचं.संगीत मानपमान हे कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर यांचं नाटक. याच नाटकावर प्रेरित संगीत मानापमान या चित्रपटाचा ट्रेलर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी फडणवीसांनी राजकीय फटकेबाजी करत हास्याचे कारंजे उडवले.फडणवीस पुढे म्हणाले, मी गेल्या दोन दिवसांत मंत्रिमंडळाचा विस्तार, खातेवाटप, बंगले वाटप करून संगीत मानापमानला आलोय. आमच्याकडे मान अपमान मनात होतो, त्याचं संगीत मीडियात वाजतं असे फडणवीसांनी म्हणताच उपस्थितांत हशा पिकला. या क्षणाचा मी साक्षी होतोय याचा मला आनंद आहे. सुबोध भावेंनी बालगंधर्व साकारला. भामिनीही साकारल आता धैर्यधर होणार आहेत. आम्हाला मुख्यमंत्री व्हावं लागतं मग उपमुख्यमंत्री व्हावं लागतं पण पुन्हा मुख्यमंत्री व्हावं लागतं.संगीत मानपमन हा चित्रपट प्रेक्षकांनी थिएटरमध्ये जाऊन पहावा. चित्रपटाचा ट्रेलर सुंदरच आहे चित्रपट देखील सुंदरच असेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

## गुंठेवारी जमिनींच्या खरेदी–विक्रीबाबतचा कायदा शिथील

### नागरिकांना १, २, ३ किंवा ५ गुंठे क्षेत्राच्या जमिनींची खरेदी–विक्री करता येणार सहज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

राज्यातील सर्वसामान्य नागरिकांसाठी एक मोठी खुशखबर आहे. सरकारने गुंठेवारी खरेदी विक्रीचा मार्ग मोकळा केलाय. गुंठेवारी खरेदी विक्री बंद असल्यामुळे लाखो नागरिकांना आर्थिक फटका बसत होता. मात्र, आता गुंठेवारी जमिनींच्या खरेदी–विक्रीबाबतचा कायदा शिथील करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतलाय. गुंठेवारी जमिनींच्या खरेदी–विक्रीबाबतचा कायदा शिथील करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतल्यामुळे आता नागरिकांना १, २, ३ किंवा ५ गुंठे क्षेत्राच्या जमिनींची खरेदी–विक्री सहज करणं देखील शक्य होणार आहे.

या नव्या नियमानुसार आता गुंठेवारी जमिनींच्या खरेदी–विक्रीसाठी आपल्याला जमिनीच्या बाजारमूल्याच्या केवळ ५ टक्के शुल्क सरकारला द्यावा लागणार आहे. या शुल्कानंतर आपली जमीन पूर्णपणे नियमित होईल. महसूल अधिनियमातील तरतुदीनुसार महाराष्ट्रात तुकडेबंदी लागू केली



होती. म्हणजे काय? तर तुकडेबंदी कायद्यात नमूद केल्याप्रमाणे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी शेतजमीन विकत घेता येत नाही. महाराष्ट्र सरकारच्या १२ जुलै २०२१ च्या परिपत्रकानुसार, १,२,३ अशी गुंठ्यांमध्ये शेतजमीन खरेदी विक्री करण्याला निर्बंध आले होते. या परिपत्रकाला विरोधही झाला होता. हे प्रकरण न्यायालयतही गेलं होतं. यामुळं शेतकऱ्यांना अडचणी येत होत्या.राज्यपालांच्या संमतीनंतर १५ आक्टोबर २०२४ रोजी एक अध्यादेश काढण्यात आला. १५ ऑक्टोंबर रोजी अध्यादेश काढत राज्य मंत्रिमंडळाने या कायद्यातील शिथिलतेला मान्यता दिली. कोणत्या कामासाठी गुंड्यामध्ये जमिनीची खरेदी–विक्री करता येणार? असा देखील प्रश्न आता उपस्थित होतो. तर, कायद्यातील सुधारणेनुसार पूर्वी झालेल्या व्यवहाराच्या रेडिरेकनरच्या ५ टक्के रक्कम शुल्क भरून व्यवहार करता येणार आहेत. मात्र, यासाठी काही अटी देखील घालण्यात आल्यात. फक्त विहीर, घर बांधकाम आणि रस्त्यासाठीच १ ते ५ गुंठ्यांचे व्यवहार करता येणार आहेत. याशिवाय इतर कामांसाठी खरेदी विक्रीला परवानगी नाकारली जाणार आहे. या कारणांसाठी गुठ्यांमध्ये जमिनीचा व्यवहार करता येणार आहे. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे नमुना–१२ प्रमाणे अर्ज करावा लागणार आहे.

## बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचं मोठं विधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २४ मुंबई**

बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोग या गावचे सरपंच संतोष देशमुख यांची अपहरण करून अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली. या घटनेनंतर संपूर्ण राज्यात मोठी खळबळ उडाली. या प्रकरणाचे पडसाद हिवाळी अधिवेशनात देखील उमटले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत निवेदन देत या संपूर्ण घटनेची माहिती दिली. तसेच या घटनेची एसआयटी आणि न्यायालयीन चौकशी करण्यात येणार असल्याची घोषणा केली. दरम्यान, संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावर राजकीय वर्तुळातून संतप्त प्रतिक्रिया येत आहेत. भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी देखील या घटनेबाबत विधानसभेत आवाज उठवला.

बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात बोलताना आमदार सुरेश धस यांनी देवेंद्र फडणवीस यांनी बीड जिल्ह्याचं पालकमंत्री पद स्वीकारावं, अशी मागणी केली. तसेच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी केली.

## संपादकीय ......

# अधिवेशनाचे फलित अन् देवेंद्र फडणवीसांचे यश

*गेल्या आठवड्यात संपूर्ण मंत्रालय नागपुरात होते. सरकारमधील तीन जणांचा शपथविधी मुंबईत पार पडला, तर उर्वरित मंत्र्यांचा शपथविधी नागपुरात पार पडला. त्यानंतर संपूर्ण अधिवेशन हे विनाखात्याच्या मंत्र्यांचे राहिले. मात्र अखेर खातेवाटप करायला शनिवारची रात्र उजाडावी लागली. त्यात आठवडाभर रुसवे-फुगवे सर्वच पक्षांचे राहिले. तीन पक्ष एकत्र आल्यामुळे रुसवे-फुगवे हे मोठ्या प्रमाणात होते. ती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची कसोटीच होती. मात्र ती त्यांनी पुरेपूर निभावून हे अधिवेशन सफल केले असेच म्हणावे लागेल. संपूर्ण अधिवेशन काळात रुसवे-फुगवे हे भाजपामध्ये होते तसे शिवसेनेचे होते तसेच ते राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातही होते. भाजपाने सुधीर मुनगट्टीवार यांना डावलले. रवी राणा यांचा मंत्रिमंडळात समावेश न केल्याने ते कमालीचे नाराज झाले व अधिवेशन सोडून गावाकडे गेले. एकनाथ शिंदे यांनी देखील नाराजी घालवण्यासाठी तीन दिवस शेतात घालवले होते. त्याचप्रमाणे रवी राणाही शेती करण्यास निघून गेले, तर त्याच वेळेस उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पुष्पगुच्छ देऊन एकनाथ शिंदे यांचे पंख छाटल्याबद्दल शुभेच्छा दिल्या अशी चर्चा संपूर्ण अधिवेशन काळात सुरू होती, तर या प्रकरणाने उद्धव ठाकरे यांच्या घरासमोर हनुमान चालिसा म्हणणाऱ्या रवी राणा यांच्या जखमेवर मीठ चोळले गेले अशी चर्चा होती. नाराज झालेल्यांमध्ये शिवसेना शिंदे गटाचे तानाजी सावंत, दीपक केसरकर, नरेश भांडेकर, राजेंद्र गावित, विजय शिवतारे हे सामील होते तसेच बहुसंख्या आमदारही नाराज असल्याचे दिसून येत होते. बहुमताच्या या सरकारवर रुसवे-फुगवे यांचा तर महापूरच आला होता. त्यामुळे विकासाचे तसेच जनतेचे प्रश्न कोण मांडणार हाही सवाल अधिवेशन काळात सुरू होता, तर त्याचवेळेस परभणी, बीड येथील हत्या प्रकरण, अमित शहा यांनी केलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दलचे उद्गार तसेच मुंबई गेटवेजवळ उलटलेली बोट हेच मुद्दे चर्चेत राहिले, असल्याचे अधिवेशन काळात दिसून आले. महायुती सरकारमध्ये अजूनही ताण कायम आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटामध्ये वादळ उठले आहे. त्यांच्या नाराजीपासून दूर पळण्यासाठी पक्ष अध्यक्ष अजित पवार त्यावेळेस दोन ते तीन दिवस नॉट रिचेबल होते.*

*छगन भुजबळ पक्षातील बहुजन चेहरा होता. मनोज जरांगे-पाटील यांच्याविरोधात मंत्रिमंडळात आवाज बुलंद करणारा होता. ओबीसी आरक्षण वाचवण्यास अनेकांनी भुजबळांना अंगावर घेतले. त्यांचा जनाधार अख्ख्या महाराष्ट्रात आहे. शिवसेनेचा दरारा असताना बंड पुकारणारे छगन भुजबळ हा इतिहास नागपुरातील हिवाळी अधिवेशनातच घडला होता. तेव्हा मुंबईहून काहीजण नागपुरात त्यांचा समाचार घेण्यात आले होते. मात्र त्यांनाही छगन भुजबळ पुरून उरले होते. मात्र या मंत्रिमंडळातून नेमका त्यांचाच पत्ता कट झाला. अशी अपमानास्पद वागणूक दिली गेल्याने ते खवळले व थेट रस्त्यावरच उतरले. ओबीसी आरक्षणाला हात लावू देणार नाही. वय वाढले, आवाज तोच आहे. पूर्वी सहा सहा आठवडा अधिवेशन चालायचे. त्यावेळी वेगळ्या विदर्भ या मुद्द्यावरून सरकारचे स्वागत होत असे. यंदाचे सहा दिवसांचे हळूहळू अधिवेशन सर्वात महत्त्वाचे असलेल्या प्रश्नोत्तरे व लक्षवेधीअभावी गुंडाळले गेले. जर लक्षवेधी व प्रश्नोत्तरेच घेता येणार नव्हती तर मग अधिवेशन इतका कोट्यवधींचा खर्च करून नागपुरात का व कशासाठी घेतले असा सवालत विचारला जात होता. मात्र शपथविधीसाठी घेतलेले दोन दिवसांचे अधिवेशन आणखी आठवडाभर पुढे घेत ते पूर्ण केले असते, तर शासनाचा मोठा खर्च वाचला असता तसेच सर्वांचा वेळही सत्कारणी लागला असता अशी चर्चा सर्वत्र होते.*

*मंत्रिमंडळाचा विस्तार हे कुठल्याही मुख्यमंत्र्याला आव्हान असते. यावेळी तर अभूतपूर्व परिस्थिती होती. सत्ता बाकांवर २०० पेक्षा जास्त आमदार आहेत. एकट्या भाजपाचे १३२ आमदार निवडून आले आहेत. मंत्रीपद आहेत, फक्त ४३ यात तीन पक्षांत ती वाटणं म्हणजे मोठे ऑपरेशन असते. प्रत्येक आमदाराला मंत्री व्हायचे असते. अडीच वर्षांचा मंत्री असा व्यवहारी मार्ग अजित पवारांनी व एकनाथ शिंदे यांनी शोधला आहे पण त्यातूनही किती जणांचे समाधान होणार? महायुतीकडे २३४ आमदार आहेत. भाजपामध्ये तर मोठे अवघड होते. मात्र देवेंद्र फडणवीस यांनी मोठ्या कुशलतेने पार पाडले तरीही काहींनी नाराजी दाखवलीच. मात्र या यंदाचे अधिवेशनाचे वैशिष्ट्य ठरले ते देवेंद्र फडणवीस. इतका आत्मविश्वास त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. त्यामुळे यंदाच्या अधिवेशनात खऱ्या अर्थाने हिरो ठरले ते देवेंद्र फडणवीसच, अशी प्रतिकूल अवस्था*

# हरभरा पिकातील सद्यस्थितीत घाटे अळीच्या नियंत्रणासाठी करा ह्या सोप्या फवारण्या

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**

मागील आठवड्यात थंडीचा जोर वाढल्यामुळे त्याचा फायदा रब्बी पिकांना झाला. पुढील आठवड्यात ढगाळ वातावरणाचा अंदाज आहे. शेतकऱ्यांच्या रब्बी हंगामातील पिकांच्या पेरण्या जवळपास पूर्ण झालेल्या आहेत.

अळीच्या नियंत्रणासाठी करा ह्या सोप्या फवारण्याया किडीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाल्यास ७० टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते. सध्या आढळणारी कीड ही अंडी अवस्था व प्रथम अवस्थेतील अळी असल्यामुळे शेतकर्यांनी वेळीच उपाययोजना केल्यास कमी खर्चात किडींचे नियंत्रण होऊ शकते. शेतकर्यांनी पाने व फुलांची जाळी करणार्या अळीची प्रादुर्भावग्रस्त जाळी गोळा करून अळीसहीत नष्ट करावीत. तसेच शेंगा पोखरणार्या अळीच्या मोठ्या अळ्या हाताने वेचून त्यांचा नायनाट करावा.

तूर पिक कळी लागण्याच्या अवस्थेत आल्यापासून एकरी दोन कामगंध सापळे (फेरोमोन ट्रॅप) पिकांच्यावर एक फूट उंचीवर लावावेत व निरीक्षण करावे. शेतामध्ये पक्षी बसण्यासाठी पिकाच्या किमान एक ते दोन फूट उंचीवर पक्षी थांबे हेक्टरी ५० ते ६० ठिकाणी उभारावेत. यामुळे पक्षांना अळ्यांचे भक्षण करणे सोपे जाईल.शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची काळजी घ्यावी. शेतकरी बांधवांनी आपल्या पिकाचे कीड व रोगासंदर्भात नियमित सर्वेक्षण करून प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास योग्य त्या उपाययोजना कराव्यात.

**हरभरा पिकावरील घाटेआळीच्या नियंत्रणासाठी**

१) घाटेअळी करीता शेतामध्ये इंग्रजी ढ आकाराचे प्रति एकरी २० पक्षी थांबे लावावेत.

२) घाटेअळीच्या सर्वेक्षणासाठी प्रति एकरी २ कामगंध सापळे लावावेत.




३) हरभरा पीक फुलोरा अवस्थेत असतांना ५% निंबोळी अर्काची किंवा ३०० पीपीएम अझाडीरेकटीन ५० मिली प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे फवारणी घ्यावी.

४) अळी अवस्था लहान असताना एच.ए.एन.पी.व्ही ५०० एल.ई. विषाणूची १० मिली प्रति १० लिटर पाणी (२०० मिली प्रति एकर) याप्रमाणे फवारणी करावी.

५) किडीने आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यानंतर इमामेक्टिन बेंझोएट ५% - ४.५ ग्रॅम प्रती १० लिटर पाणी याप्रमाणे (प्रती एकर ८८ ग्रॅम) किंवा

क्लोरॅट्रानिलीप्रोल १८.५% - ३ मिली प्रती १० लिटर पाणी याप्रमाणे (प्रती एकर ६० मिली) किंवा फ्लुबेंडामाईड २०% - ५ ग्रॅम प्रती १० लिटर पाणी याप्रमाणे (प्रती एकर १२५ ग्रॅम) फवारावे.

**गहू-** गहू पिकावर मावा कीड दिसून येताच मेटारायझियम ॲनिसोप्ली किंवा व्हर्टिसिलीयम लेकॅनी ११५ टक्के डब्ल्यू, पी. ४० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.

**ज्वारी**-ज्वारी पिकावर चिकटा रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास थायोमेथोक्झाम ५ ग्रॅम व मॅन्कोझेब २.५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून आवश्यकतेनुसार फवारावे.

# मानवी जीवन सुकर होण्यासाठी अधिकाधिक संशोधनाची गरज - डॉ.एस.पी. काणे

## विद्यापीठात आविष्कार २०२४ संशोधन महोत्सव स्पर्धेचे उद्घाटन संपन्



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

विज्ञानाने खूप प्रगती केली. दिवसेंदिवस नवनवीन संशोधन होत असून त्या संशोधनाचा समाजाला अधिकाधिक कसा फायदा होईल, हा दृष्टीकोन समोर ठेवून उदयोन्मुख संशोधकांनी संशोधन केले पाहिजे. निसर्गात रोज अनेक घटना घडतात, त्याचे सूक्ष्म निरीक्षण करुन तद्वतच त्यावर संशोधन करुन नवनवीन संशोधनातून मानवी जीवन सुकर होवू शकते, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.एस.पी. काणे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आविष्कार सेलच्यावतीने संशोधन महोत्सव आविष्कार २०२४ चे आयोजन पाचही जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले होते, त्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, न.न.सा.चे संचालक डॉ. अजय लाड, आविष्कार कक्षाच्या समन्वयक डॉ. वैशाली धनविजय, आयोजक सचिव डॉ. गजानन मुळे उपस्थित होते.

फित कापून आविष्कार स्पर्धेचे उद्घाटन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. पुढे बोलतांना डॉ. काणे म्हणाले, सहभागी सर्व विद्यार्थी उत्कृष्टरितीने आपल्या संशोधनाचे सादरीकरण करतील आणि यामधून उत्कृष्ट संशोधनाचे राज्यस्तरीय सादरीकरण होईल. विज्ञान व तंत्रज्ञान हा प्रत्येकाच्या जीवनामध्ये महत्वाचा घटक आहे आणि दररोज त्याचा संबंध येतो. मानवी जीवन सुकर होईल अशा विविध बाबींवर विद्यार्थ्यांनी निरीक्षण करुन संशोधन केले पाहिजे. त्यांच्या संशोधनामुळे समाजाचा विकास होण्यास निश्चितच हातभार लागेल. सर्व प्राणीमात्रांमध्ये मनुष्याला शरीर, मन व बुद्धी दिली आहे. मानवी जीवन सुखी करण्यासाठी विज्ञानाच्या आधारावर संशोधन करीत असतांना अध्यात्माचा आधार सुद्धा महत्वाचा आहे. विज्ञान व अध्यात्म हे एकमेकांना पूरक आहेत. विद्यार्थ्यांनी निसर्गातील अनेक बाबींचे सूक्ष्म निरीक्षण करुन त्यावर समाजाच्या भल्यासाठी संशोधन करावे, असेही ते याप्रसंगी म्हणाले.

**आविष्कार उदयोन्मुख संशोधकांसाठी उत्तम संधी - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते**

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू म्हणाले, आविष्कार म्हणजे नवीन काही तरी शोधून काढणे. वैज्ञानिक दृष्टीने एखाद्या संशोधनातून जे आऊटपूट निघते, त्याला आविष्कार म्हटल्या जाते. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनासाठी क्रिएटीव्हिटी व ओपन माईंड असणे गरजेचे आहे. तद्वतच सूक्ष्म निरीक्षण त्याने करायला हवे. शास्त्रज्ञ न्यूटनने झाडावरुन फळ खाली पडल्यानंतर त्याचे सूक्ष्म निरीक्षण केले व संशोधनातून गुरूत्वाकर्षणाचा शोध लावला. कृत्रिम बुद्धीमत्तेच्या विविध अंगाने अनेक शोध लागत आहेत. आपल्या हातातील मोबाईलद्वारे आपण जगातील कुठल्याही भागात व्हिडीओच्या माध्यमातून बोलू शकतो. भविष्यात नवनवीन संशोधन सातत्याने येत राहतील, त्यामुळे विद्यार्थ्यांनी उदयोन्मुख संशोधक होवून समाजाच्या विकासाकरीता गरजेनुरुप नवनवीन संशोधन करण्यासाठी सातत्यपूर्ण पुढाकार घेतला पाहिजे. राज्यपाल महोदयांच्या कल्पनेतून सुरु झालेली आविष्कार स्पर्धा ही निश्चितच विद्यार्थ्यांकरीता मोलाची संधी असल्याचे मत कुलगुरूंनी व्यक्त केले.

# कपड्यांचा रंग निळा असल्याने कुणी आंबेडकरवादी होत नाही', नारायण राणेंचा राहुल गांधींना टोला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४मुंबई-** काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज परभणीचा दौरा करत मयत सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. या भेटीनंतर राहुल गांधी यांनी सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूप्रकरणी पोलीस आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले. सोमनाथ सूर्यवंशी दलित असल्याने पोलिसांनी त्याची हत्या केली. याबद्दल मुख्यमंत्र्यांनी खोटे निवेदन विधानसभेत दिले, असा दावा राहुल गांधी यांनी केला. त्यानंतर भाजपामधून तिखट प्रतिक्रिया उमटू लागल्या आहे. भाजपा खासदार आणि माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांनीही राहुल गांधी यांच्यावर टीका केली आहे.



कपड्यांचा रंग निळा असल्याने कुणी आंबेडकरवारी होत नाही, असा टोला नारायण राणे यांनी लगावला आहे. राहुल गांधींवर टीका करताना नारायण राणे म्हणाले की, राहुल गांधी यांना अद्याप महाराष्ट्र कळलेला नाही.




## सकाळी झोपेतून उठल्यावर हात-पायांमध्ये कमजोरी, मुंग्या आल्यासारखे वाटते? पाहा त्याची कारणे..

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**

अनेकदा सकाळी झोपेतून उठल्यावर असं जाणवतं की, एक हात सुन्न झाला आहे किंवा निर्जीव झाला आहे? असं थोड्या वेळासाठी जाणवत असेल तर सामान्य आहे. ही स्थिती तंत्रिका दबावामुळे होते. मात्र, अनेकदा याचं कारण शरीरात वाढत असलेल्या काही गंभीर आरोग्यासंबंधी समस्याही असू शकतात.




झोपेतून उठल्यावर हातांमध्ये सुई टोचल्यासारखं वाटणे, हात-पाय सुन्न होत असेल तर तंत्रिकेसंबंधी समस्या असू शकते. अनेकदा तुम्ही अशा स्थितीत झोपतात, ज्यामुळे तंत्रिकांवर दबाव पडतो. झोपेत ब्लड फ्लो कमी झाल्या कारणानेही असं होऊ शकतं.

हात-पाय सुन्न होण्याची कारणं
कार्पल टनल सिंड्रोम
डायबिटीस
रूमेटायड संधिवात
मनगटात ट्यूमर किंवा सिस्ट
थायरॉइड ग्रंथी कमी सक्रीय असणं
हार्मोनमध्ये बदल
मोनोपॉज किंवा गर्भावस्था
एखादं इन्फेक्शन
व्हिटॅमिनची कमतरता
जास्त मद्यसेवन
एखादी जखम किंवा औषधांचं सेवन

कार्पल टनल सिंड्रोम काय आहे?

कार्पल टनल सिंड्रोम तेव्हा होतो जेव्हा मनगटातील एक तंत्रिका संकुचित होते किंवा दाबली जाते. यामुळे हात आणि बोटांमध्ये सुन्नपणा, झिणझिण्या आणि वेदना जाणवते. खासकरून अंगठे आणि बोटांमध्ये असं जाणवू लागतं. ही समस्या त्या लोकांमध्ये जास्त दिसते जे टायपिंग किंवा बोटांची चालवल्या जाणाऱ्या उपकरणांचा वापर करतात. जास्त काळ असं करणाऱ्या लोकांमध्ये तंत्रिकावर दबाव पडू लागतो.

**आराम मिळवण्यासाठी व्यायाम**

जर तुम्हाला सकाळी झोपेतून उठल्यावर ही समस्या जाणवत असेल तर काही वेळ व्यायाम करण्याचा सल्ला दिला जातो. जसे की, सकाळी उठून वार्म-अप स्ट्रेचिंग करा. यात हाताचं मनगट गोल फिरवणे, खाली-वर करणे यांचा समावेश करता येईल. बोटं एकमेकांपासून दूर पसरवा, जवळ आणा आणि पुन्हा पसरवा. याने आराम मिळेल. अंगठे मागे खेचू शकता. अशा क्रिया करून हातांना आराम देऊ शकता.

# २६ ते २८ डिसेंबर दरम्यान जिल्ह्यांत पाऊस, गारपिटीची शक्यता

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**

गेल्या दिवसांपासून प्रचंड गारठा जाणवत असून या आठवड्यात थंडीसह पाऊस, आणि गारपिटीची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तर आज व उद्या (सोमवार व मंगळवार दि. २३ व २४ डिसेंबर) ला मुंबई,कोकणसहित संपूर्ण महाराष्ट्रात बोचऱ्या वाऱ्यासहित माफक प्रमाणात थंडीची शक्यता ही कायम असल्याचे मत जेष्ठ निवृत्त हवामान तज्ञ माणिकराव खुळे यांनी व्यक्त केले आहे. .

**ऊबदारपणा** :परवा व नंतर, बुधवार आणि गुरुवार दि. २५-२६ डिसेंबरला ढगाळ वातावरणासहित किंचितशीच थंडी कमी होवून संपूर्ण महाराष्ट्रात ऊबदारपणा जाणवेल.

**पाऊस** : गुरुवार ते शनिवार दि. २६ ते २८ डिसेंबर दरम्यानच्या तीन दिवसात संपूर्ण महाराष्ट्रात ढगाळ वातावरण राहून तुरळक ठिकाणी गडगडाटीसह किरकोळ पावसाची शक्यता जाणवते. त्यातही विशेषतः नंदुरबार धुळे जळगांव मालेगाव नाशिक नगर पुणे सातारा कोल्हापूर सोलापूर छ.सं.नगर अकोला अमरावती नागपूर वाशिम शेगाव नगर पुणे नागपूर गोंदिया चंद्रपूर नांदेड परभणी जिल्ह्यात व लगतच्या




परिसरात पावसाची शक्यता अधिक जाणवते. सध्याच्या २६ डिसेंबर दरम्यान देशात प्रवेशलेले प्रखर पश्चिम प्रकोपाच्या प्रेरित परिणामातून व राजस्थानच्या आग्नेय ला दिड ते दोन किमी. उंचीपर्यंतच्या पातळीतील थंड कोरडे चक्रीय वाऱ्यांची व ८०० मीटर उंचीपर्यंतच्या खालच्या पातळीतील अरबी समुद्रातून नैरुत्य दिशेकडून तर बं. उपसागरातून पूर्वे दिशेकडून आलेल्या आर्द्रतायुक्त वाऱ्यांची अशा तीन वाऱ्यांच्या टक्करीतून कमी उंचीवरच सांद्रीभवन घडून येते-न -तेच घनीभवन होवून म्हणजेच डायरेक्ट द्रविकरणाची स्टेज लगेचच ओलांडून घनीभवन होवून गारपीट होण्याची शक्यता निर्माण होत आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

विदर्भ प्रजासत्ताक
मंगळवार दि. २४ डिसेंबर २०२४
शहर/ग्रामिण

# देशभरात 'डिजीटल अरेस्ट'ची धास्ती, काय दिला जातो जनजागृतीपर संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

देशभरात सायबर गुन्हेगारी झपाट्याने वाढली असून केंद्र सरकारने 'डिजीटल अरेस्ट'चा धसका घेतला आहे. कुणालाही फोन लावण्यापूर्वी 'डिजीटल अरेस्ट' या गुन्ह्याबाबत जनजागृतीपर संदेश ऐकविल्या जात आहे. सरकारच्या या उपक्रमामुळे अनेकांना सायबर गुन्हेगारांपासून सावध राहता येणार आहे.

'जर तुम्हाला सीबीआय, न्यायालय, पोलीस, ईडी अधिकाऱ्याचा फोन किंवा व्हिडिओ कॉल आल्यास घाबरु नका. तो फोन सायबर गुन्हेगारांचा असू शकतो. त्यामुळे अशा फोन कॉलला प्रतिसाद देऊ नका.' अशाप्रकारचा संदेश मोबाईलवर फोन लावण्यापूर्वी



ऐकविल्या जात आहे. नागरिकांची सायबर गुन्हेगारांकडून फसवणूक होऊ नये म्हणून भारत सरकारने सावधतेचा पवित्रा घेतला आहे. देशभरात सायबर गुन्हेगारांनी 'डिजीटल अरेस्ट' सह अन्य गुन्ह्यांद्वारे १२०० कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम हडपली आहे. सायबर गुन्हेगार भारतातील नागरिकांचे सीमकार्ड, आधारकार्ड आणि मोबाईल फोनसुद्धा वापरत आहेत. वाढती सायबर गुन्हेगारी अनेक राज्याची डोकेदुखी ठरली आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीसुद्धा 'डिजीटल अरेस्ट' या सायबर गुन्ह्यासंदर्भात 'मन की बात'मध्ये उल्लेख केला होता.

### संदेशामुळे टळतोय 'डिजीटल अरेस्ट'चा धोका

भारत सरकारकडून फोन लागण्यापूर्वी देण्यात येणाऱ्या जनजागृतीपर संदेशामुळे 'डिजीटल अरेस्ट' या गुन्ह्याबाबत अनेकांना माहिती मिळत आहे. 'डिजीटल अरेस्ट' हा फसवणुकीचा प्रकारि अनेकांच्या लक्षात येत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत सकारात्मक परिणाम दिसून येईल. पूर्वी 'डिजीटल अरेस्ट' केल्याच्या घटना वाढल्या होत्या. त्यामुळेच शासनाने जनजागृतीवर भर दिला आहे.

महाराष्ट्रात सायबर गुन्हेगारांनी 'डिजीटल अरेस्ट' करण्याची भीती घालून शेकडो नागरिकांची फसवणूक करुन त्यांच्या खात्यातून पैसे परस्पर आपल्या खात्यात वळते केले आहेत. मोठमोठे व्यापारी, सेवानिवृत्त अधिकारी, जेष्ठ नागरिक, ज्यांची मुले विदेशात स्थायिक झाली आहेत अशा वृद्धांना 'डिजीटल अरेस्ट'ची भीती दाखवून लुबाडल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. सध्याच्या काळात देशभरात 'डिजीटल अरेस्ट'ची प्रकरणे दाखल होण्याचे प्रमाण वाढले असल्यामुळेच सरकारने 'डिजीटल अरेस्ट'चा धसका घेतला आहे. त्यामुळेच मोबाईलवर फोन लागण्यापूर्वी डिजीटल अरेस्ट या गुन्ह्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

# जिल्हा नियोजनमधील मागणी तात्काळ नोंदवावी

### -जिल्हाधिकारी सौरभ कटियार



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

जिल्हा नियोजनमधील वितरीत करण्यात आलेला निधी तातडीने खर्च करावा, तसेच आवश्यक असलेल्या निधीची मागणी तातडीने नोंदवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजनचा आढावा घेण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, जिल्हा नियोजन अधिकारी अभिजित मस्के आदी उपस्थित होते.श्री. कटियार यांनी, निवडणुकीपूर्वी मान्यता घेऊन सुरू करण्यात आलेली कामे चालू ठेवावीत. परंतू ज्या कामांच्या निविदा झालेल्या नाहीत, अशा कामांची आवश्यकता तपासून कामे सुरू करावीत. प्रामुख्याने शाळा दुरूस्तीची कामे तातडीने सुरू करावीत. रस्ते, आरोग्य विभागाच्या कामांचे दायित्व मोठ्या प्रमाणावर असते. त्यामुळे खर्च होऊ शकतील, अशाच कामांचे दायित्व सादर करावेत. तसेच मागील दायित्व पूर्ण करून नवीन कामे घेण्यात यावीत.यावर्षीचा निधी खर्च करण्यासाठी तीन महिन्याचा कालावधी शिल्लक राहिला आहे. त्यामुळे एक महिन्याच्या आत प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी. प्रशासकीय मान्यता घेतली नसल्यास निधी इतर विभागाकडे वळता करण्यात येतील. मान्यता दिलेली कामे निविदा प्रक्रिया करून सुरू झाली असल्यास अशी कामे पूर्ण होतील, यासाठी प्रयत्न करण्यात यावे. यामुळे जिल्हा नियोजनचे चित्र चांगले दिसण्यास मदत होईल.सुशासन सप्ताह प्रभावीपणे राबववावाकेंद्र शासनातर्फे सुशासन सप्ताह राबविण्यात येत आहे. हा सप्ताह प्रभावीपणे राबवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले. नागरिकांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी ई-ऑफीसचा अवलंब करावा, असे आवाहन केले. कार्यालयातील प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन तातडीने निकाली काढण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे. तसेच कार्यालयातर्फे करण्यात आलेल्या चांगल्या कामांची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावी, असे निर्देश दिले.

# केंद्रीय शाळांमधील ५वी, ८वीच्या विद्यार्थ्यांची ढकलगाडी आता बंद

## दोन महिन्यांत पुनर्परीक्षा होणार

### सरसकट उत्तीर्ण करणार नाही; केंद्र सरकारने घेतला निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांना नापास न करता सरसकट उत्तीर्ण करण्याचे धोरण केंद्र सरकारने रद्द केले आहे. शिक्षण मंत्रालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, याबाबतची अधिसूचना केंद्रीय विद्यालये, नवोदय विद्यालये आणि सैनिक शाळांसहकेंद्र सरकारद्वारे चालवल्या जाणाऱ्या तीन हजारांहून अधिक शाळांना लागू असेल.



२०१९ मध्ये शिक्षण हक्क कायद्यात (आरटीई) सुधारणा केल्यानंतर किमान १८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी या दोन वर्गांसाठी नापास न करण्याचे धोरण समाप्त केले आहे. नियमित परीक्षेत एखादा विद्यार्थी अपयशी झाला तर त्याला दोन महिन्यांत पुन्हा परीक्षा देण्याची संधी दिली जाईल. तथापि, पुनर्परीक्षेला बसणारा एखादा विद्यार्थी यशस्वी ठरला नाही, तर त्याला पाचवी किंवा आठवीच्या वर्गातच ठेवले जाईल. अभ्यासात मागे राहिलेल्या मुलांची यादी शाळेचे मुख्याध्यापक तयार करतील. त्या मुलांच्या प्रगतीवर वैयक्तिकरीत्या लक्ष ठेवतील.

### या राज्यांनी धोरण यापूर्वीच केले रद्द

१६ राज्ये आणि दिल्लीसह दोन केंद्रशासित प्रदेशांनी यापूर्वीच या दोन वर्गांसाठी नापास न करण्याचे धोरण रद्द केले आहे. हरयाणा आणि पुद्दुचेरी यांनी याबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही. ज्या राज्यांनी आणि केंद्रशासित प्रदेशांनी हे धोरण रद्द केले आहे त्यात महाराष्ट्रासह आसाम, बिहार, गुजरात, हिमाचल प्रदेश, झारखंड, मध्य प्रदेश, मेघालय, नागालँड, पंजाब, राजस्थान, सिक्कीम, तामिळनाडू, त्रिपुरा, उत्तराखंड, पश्चिम बंगाल, दिल्ली, दादरा आणि नगर हवेली व जम्मू-काश्मीर यांचा समावेश आहे.

# समृद्धी महामार्गावर अपघातांसह गुन्हेगारीतही वाढ

## डिझेल चोरीसाठी महागड्या वाहनांचा वापर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४बुलढाणा : -**

गेल्या दोन वर्षांत लहान-मोठ्या अपघातांमुळे गाजणाऱ्या हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे समृद्धी द्रुतगती महामार्ग वाढत्या गुन्हेगारीमुळेदेखील वादग्रस्त ठरत आहे. समृद्धी महामार्गावरील डिझेल चोरीच्या घटनांत लक्षणीय वाढ झाली आहे. यासाठी महागड्या चारचाकी वाहनांचा सर्रास वापर करण्यात येत असल्याचे धक्कादायक चित्र आहे. यावर कळस म्हणजे इंधन चोरीच्या या धंद्यात आता स्थानिक (बुलढाणा जिल्ह्यातील)



चोरट्यांच्या टोळ्यासुद्धा उतरल्या आहेत.

लोणार तालुक्यातील बीबी पोलिसांनी केलेल्या कारवाईत ही बाब ठळकपणे सिद्ध झाली आहे. बीबी पोलीस ठाण्याच्या पथकाने बुलढाणा जिल्ह्यातील चौघा आरोपींना अटक केली आहे. यातील एक आरोपी इंधन चोर टोळीने चोरलेले डिझेल खरेदी करणारा निघाला आहे.दरम्यान, २१ डिसेंबर रोजी रात्री उशिरा ही कारवाई पूर्ण करून बीबीकडे जात असताना पोलिसांना एक संशयास्पद स्कारपीओ वाहन आढळून आले. त्याला थांबविले असता त्यातील व्यक्ती अंधाराचा फायदा घेत पसार झाले. त्या वाहनात १८ लिटरच्या कॅन सापडल्या.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते करीना थापाचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

अपार्टमेंटमध्ये लागलेल्या आगीमध्ये सिलींडरचा स्फोट होण्यापासून रोखणाऱ्या आणि ७० कुटुंबाचे रक्षण करणाऱ्या करीना थापाचा जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी सत्कार केला. यावेळी करिना थापाला शिक्षण आणि खेळासाठी सर्वोतोपरी मदत करण्यात येईल, असे आश्वासन जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी दिले. तसेच तिच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.जिल्हाधिकारी कार्यालयात श्री. कटियार यांनी करिना आणि तिच्या कुटुंबियांशी संवाद साधला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. श्री. कटियार यांनी थापा कुटुंबियांची माहिती



घेतली. करीना हिची शैक्षणिक माहिती तसेच खेळातील अभिरूचीबाबत माहिती घेतली. बॉक्सींग खेळात तिचे प्राविण्य असल्याने जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे तिला योग्य ती सर्व मदत करण्यात येईल, असे आश्वासन दिले. करीनाने शिक्षण आणि खेळामध्ये मेहनत करावी, खेळामध्ये सुरवातीच्या काळात मदत मिळणे कठिण असते, त्यामुळे जिल्हा प्रशासनातर्फे तिला पूर्ण मदत करण्यात येईल, असे सांगितले.यावेळी जिल्हाधिकारी यांनी करिना हिचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. तसेच भेटवस्तूही दिल्या. करीनाच्या धाडसाची दखल

### प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी निवड गुरूवारी राष्ट्रपतींच्या हस्ते दिल्लीत गौरव

घेत केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयाने प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी करीनाची निवड केली आहे. तिला राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रपती भवनात गुरूवार, दि. २६ डिसेंबर रोजी समारंभपूर्वक गौरविण्यात येणार आहे. पदक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

# 'पद्मश्री' शंकरबाबा पापळकरांचे कार्य शुक्रवारी झळकणार सह्याद्रीवर

## प्रख्यात निवेदक नितीन भट साधणार संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती :**

एकशे तेवीस अंध, अपंग, निराधार आणि मतिमंद मुलांना स्वतःचे नाव देणारा बापमाणूस... त्यांचे संगोपन, शिक्षण करून त्यातल्या काही मुलामुलींची लग्न लावून त्यांचे आयुष्य मार्गी लावणारा पिता... सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी असलेले 'वझ्झर' नावाचे छोटेसे गाव आपल्या आगळ्यावेगळ्या कार्याच्या माध्यमातून जगाच्या नकाशावर नेऊन ठेवणारा सेवाव्रती... मोठमोठाले पुरस्कार आणि मानसन्मान नम्रपणे नाकारणारा अवलिया माणूस... असे बहुपेढी व्यक्तिमत्व असलेले 'पद्मश्री' शंकरबाबा पापळकर यांच्या कार्याची ओळख करून देणारा कार्यक्रम शुक्रवार दि. २७ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून प्रसारित होणार आहे.

या कार्यक्रमात अमरावतीचे प्रख्यात निवेदक आणि गज़लकार नितीन भट शंकरबाबांशी संवाद साधणार आहेत. 'हॅलो सह्याद्री' या कार्यक्रमातून 'समाजसेवेतून क्रांती' या विषयावर हा कार्यक्रम सादर होणार आहे.

अमरावती जिल्ह्यातल्या अचलपूर तालुक्यातील वझ्झर येथे स्व. अंबादासपंत वैद्य सेवाश्रमातून शंकरबाबा पापळकर यांचे सुरु असलेले अलौकिक कार्य या



कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासियांना बघायला मिळणार आहे. नागपूर दूरदर्शनने या कार्यक्रमाची निर्मिती केलेली असून कार्यक्रमाची संकल्पना रचना पोपटकर-गजभिये यांची आहे तर निर्माती मीनल पाठराबे आहेत.

# लढणे थांबविणार नाही, उद्धव ठाकरे यांची भूमिका

## मुंबईत जानेवारीपासून शाखानिहाय बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४मुंबई** – मुंबईत उद्धवसेनेकडून 'शिव सर्वेक्षण यात्रा' सुरू करण्यात आली होती. मुंबईतील ३६ विधानसभा क्षेत्रांसाठी नेमलेल्या निरीक्षकांनी आपला अहवाल पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना दिला असून, जानेवारीपासून उद्धव ठाकरे मुंबईतील सर्व शाखांना भेट देऊन शाखाप्रमुखांशी संवाद साधून त्यांची मते जाणून घेणार आहेत. समोर कुणीही असले तरी लढणे थांबविणार नाही, अशी भूमिका ठाकरे यांनी घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली.



आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धवसेनेच्या शिव सर्वेक्षणामध्ये गटप्रमुखांनी स्वबळावर लढण्याची मागणी निरीक्षकांकडे केली होती.

निरीक्षकांनी आपला अहवाल मातोश्री निवासस्थानी ठाकरे यांच्याकडे शनिवारी सुपुर्द केला. यावेळी पक्षाचे नेते विनायक राऊत उपस्थित होते, असे सूत्रांनी सांगितले.

प्रसंगी रस्त्यावर उतरू

ठाकरे यांनी निरीक्षकांचे म्हणणे ऐकून घेतले आणि जानेवारीत शाखाप्रमुख, उपविभागप्रमुख आणि विभागप्रमुखांशी चर्चा करून निर्णय जाहीर करू. कोणी सोबत असो वा नसो, महाराष्ट्रासाठी, मुंबईसाठी लढणे कधीच थांबणार नाही. कुणीही विरोधक असला तरी आपली भूमिका कायम मुंबई आणि महाराष्ट्राच्या हितासाठीच असेल. त्यासाठी रस्त्यावर उतरू, असा निर्धार त्यांनी व्यक्त केल्याचे सूत्रांनी सांगितले.

# रब्बी हंगामासाठी पिकांना पाणी उपलब्ध करुन दिले जाणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती,:** जिल्ह्यात यंदा समाधानकारक पाऊस पडला आहे. त्यामुळे जिल्हा परिषद जलसंधारण विभागाच्याअखत्यारित येणाऱ्या जिल्ह्यातील २४७ पैकी २२४ कोल्हापुरी, साठवण बंधाऱ्यात जलसाठा पर्याप्त प्रमाणात आहे. त्यामुळे रब्बी हंगामातील पिकांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याचा ग्रामीण भागातील सुमारे ६ हजार ३४४ हेक्टर सिंचन क्षेत्राला लाभ होणार आहे. आहे. याचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांनी केले आहे. कोल्हापुरी बंधाऱ्यातून ६ हजार हेक्टर क्षेत्राला सिंचनासाठी लागणारे २२४ बंधाऱ्यात पाणी अडविण्यात आले. हा जलसाठा कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा, पहूर ता. नांदगाव खंडेश्वर येथे अडविण्यात आला आहे. जिल्हा परिषद जलसंधारण विभागाकडून या बंधाऱ्याच्या कामासाठी जिल्हा निधी व जिल्हा वार्षिक



निधीमधून विविध कामे करण्यासाठी नियोजन केले होते. या नियोजनामधून केलेल्या कामामुळे कोल्हापुरी व साठवण बंधारे तुडुंब भरलेली आहेत. जिल्हा परिषदेच्या जलसंधारण विभागाच्या कार्यक्षेत्रातील १४ तालुक्यांत २४७ कोल्हापुरी व साठवण बंधारे आहेत. या बंधाऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणात जलसंचय झाला आहे. त्यामुळे आता रब्बी हंगामात शेती पिकांना पाणी उपलब्ध करण्याचे नियोजन मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती महापात्र यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले आहे. जिल्ह्यात दरवर्षी रब्बी हंगामात गहू, हरभरा या रब्बी पिकांची मोठ्या प्रमाणात लागवड करतात. या पिकांना सिंचनाची सोय व्हावी, यासाठी जलसंधारण विभागाकडून शेती पिकांसाठी शेतकऱ्यांना कोल्हापुरी व साठवण बंधाऱ्याच्या माध्यमातून पाणी उपलब्ध करून दिल्या जाते. यंदा जिल्हा परिषद जलसंधारण विभागाकडील २४७ बंधाऱ्यांमध्ये जलसाठा करण्याचे पावसाळ्यापूर्वी नियोजन करण्यात आले. त्यानुसार २४७ कोल्हापुरी व साठवण बंधाऱ्यांमध्ये यंदा चांगला पाऊस पडल्याने शंभर टक्के जलसाठा झालेला आहे. या जलसाठ्यातून सुमारे ६ हजार ३४४.०१ हेक्टर एवढ्या क्षेत्राला सिंचन सुविधेचा लाभ होणार आहे. जलसंधारण विभागाने शेतकऱ्यांकडून पाणी मागणी अर्ज मागविले आहेत.

# बाजार समितीत भाजीपाला आवक वाढली दरात घसरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि२४अमरावती–**

स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्केटमध्ये भाजीपाल्याच्या आवकमध्ये वाढ झाल्याने जवळपास ३० टक्क्यांनी भाज्यांचे दर घसरले. त्यामुळे सर्वसामान्यांमध्ये समाधान व्यक्त होत असले, तरी बळीराजा चिंतेत पडला आहे. पुढील महिनाभर दरातील ही घसरण कायम राहणार असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. तर दूसरीकडे मात्र हिवाळ्यात सर्वात मागणी असणारा वाटाणा व लसूणच्या किमती मात्र कमी होण्याची शक्यता दिसत नाही.

ऑक्टोबर अखेरीस



परतीच्यापावसाने दणका दिल्यामुळे शेतकऱ्यांना नुकसानीला सामोरे जावे लागले होते. यातभाजीपाल्याचे नुकसान झाल्यामुळे आवक कमी होऊन भाजीपाला दरात मोठी वाढ झाली होती. मात्र नुकसान होऊनही शेतकऱ्यांनी न डगमगता रब्बी पिके आणि भाजीपाला हंगामावर लक्ष केंद्रित केल्यामुळे डिसेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात भाजीपाला बाजारात आणण्यात बळीराजा यशस्वी झाला. मात्रयामुळे भाजीबाजारात आवक मोठ्या प्रमाणात वाढल्याने दरात घसरण झाल्याचे चित्र दिसून येत आहे. पावसाचा दणका, दवामुळे होणारे नुकसान सहन करून शेतमालाचे रक्षण करीत बळीराजाने भाजीपाला बाजारात आणला. मात्र आवक वाढल्याने दरात घसरण झाली. यामुळे नुकसान होत असून, शेतकरीवर्ग चिंतेतपडला आहे.

### दर घसरल्याने दिलासा

थंडीचा सुरू होताच गत पंधरवड्यात १०० ते १२० रुपये दराने विक्री होणारा भाजीपाला ५० ते ६० रुपयाने विक्री होत असल्याने सर्वसामान्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. फेब्रुवारीपर्यंत आवक सुरूच राहणार असल्याने भाव स्थिर राहणार असल्याची आशा सामान्यजन व्यक्त करीत आहेत.गत पंधरवड्यात १०० रूपये किलोने विक्री होणाऱ्या भाज्यांची आवक वाढल्याने ८० रुपयांवर आले असून ६० रूपये प्रतिकिलो दराने विकले जाणारे टोमॅटो सध्या ३० रुपये प्रतिकिलोवर आलेले आहेत. भेंडी, शेवगा, मिरची यांच्या दरातही घसरण झाली असून गिलके, दोडके, कारले हेदेखील ६० रुपयांच्या आत आहेत. गवार, बटाटे आटोक्यात आहेत. पंधरा दिवसांआधी ६० ते ७० रुपयांना मिळणारी मेथी ३० रुपयांवर आली आहे. ८० रुपये किलो विक्री होणारी कोथिंबीर ४० रुपये किलोने विक्री होत आहे.

# नांदगाव खंडेश्वर 'आयटीआय'मध्ये संस्थास्तरीय तंत्रप्रदर्शन संपन्न

## अभियांत्रिकी गटातून धान्य सफाई मशीन मॉडेलला प्रथम क्रमांक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४नांदगाव खंडेश्वर**

विद्यार्थ्यांकडून नाविन्यपूर्ण मॉडेल्सची निर्मिती व प्रोत्साहनासाठी नांदगाव खंडेश्वर येथील एकनाथराव रानडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) मध्ये संस्थास्तरीय तंत्रप्रदर्शन नुकतेच आयोजित करण्यात आले होते. यात अभियांत्रिकी गटातून पत्रेकारागीर ट्रेडच्या धान्य सफाई मशीन मॉडेलला प्रथम क्रमांक तर बिगर अभियांत्रिकी गटातून कोपा ट्रेडच्या ॲक्का स्टार्क मॉडेलला प्रथम क्रमांक देण्यात आला. सदर तंत्र प्रदर्शन हे प्राचार्य नंदनसिंह भुकवाल व प्रभारी प्राचार्य सुरेश मेंढे यांच्या मार्गदर्शनात पार पडले. याच उपक्रमाचे विस्तारित स्वरूप म्हणून २७ डिसेंबरला जिल्हास्तरीय प्रदर्शन अमरावती च्या आयटीआयमध्ये भरविण्यात येणार आहे.वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार कौशल्य विकासाच्या दृष्टीने आयटीआयमध्ये महत्वपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. त्याच अनुषंगाने तंत्र प्रदर्शन नांदगाव खंडेश्वरच्या आयटीआय मध्ये आयोजित करण्यात आले होते. या तंत्र प्रदर्शनीचे उद्घाटन स्थानिक वायईएस इंग्लिश मेडीयम स्कूल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य नारायण सोनोने यांच्या हस्ते रिबीन कापून करण्यात आले. यावेळी आयटीआयचे प्रभारी प्राचार्य सुरेश मेंढे, वायईएस स्कूलचे शिक्षक गायत्री गरूड, सुधिर गेडाम, जाकीर हुसैन उर्दु हायस्कूलचे शिक्षक मोहम्मद साबीर, फरहान दानिश आदींची उपस्थिती होती. यावेळी सर्व व्यवसायाच्या प्रशिक्षणार्थ्यांनी नाविन्यपूर्ण संकल्पनेतून धान्य सफाई मशीन, रॉकेट, वेस्ट मटेरीयल पासून बनविलेल्या वस्तू, पेट्रोल सायकल, इलेक्ट्रिसिटी विना चालणारे वॉटर पंप, एअर पोल्युशन कंट्रोल करून धुरापासून शाई तयार करणारे यंत्र, वाऱ्यापासून इलेक्ट्रीसिटी तयार करणे, सुर्यग्रहन – चंद्रग्रहन पृथ्वी परिभ्रमण कार्य, कर्चऱ्यापासून इलेक्ट्रिसिटी तयार करणे, रोटरी स्विच, ॲक्का स्टार्क, राधा कृष्णा अँड शिवपार्वती थिम, वेडींग कलेक्शन अँड बॅग असे अनेक मॉडेल तयार केले होते. सदर मॉडेल्स बघण्यासाठी नांदगाव खंडेश्वर शहरातील वायईएस इंग्लिश मेडीयम स्कूल व ज्युनिअर कॉलेज, जाकीर हुसैन उर्दु हायस्कूल व वेणी गणेशपुरच्या विकास विद्यालय येथील विद्यार्थी आयटीआयमध्ये आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी सर्व मॉडेल्सची पाहणी करून त्याबद्दल विस्तृत माहिती घेतली. या तंत्र प्रदर्शनीमध्ये अभियांत्रिकी गटातून प्रथम क्रमांक पत्रेकारागीर ट्रेडचे प्रशिक्षणार्थी चेतन मारोटकर, उमेश झिमटे, चंचल खाकरे व प्राची हुड यांनी तयार केलेल्या धान्य सफाई मशीनला प्रथम



क्रमांक तर दुसरा क्रमांक तारतंत्री (वरिष्ठ) ट्रेडचे प्रशिक्षणार्थी संकेत मोहकार व ईश्वरी घोरपडे यांनी बनविलेल्या कर्चऱ्यापासून इलेक्ट्रिसिटी तयार करणे या मॉडेलला देण्यात आला. याशिवाय बिगर अभियांत्रिकी गटातून कोपा ट्रेडचे प्रशिक्षणार्थी शुभम घाटे व समीर लतीफ शेख यांच्या ॲक्का स्टार्क या मॉडेलला प्रथम क्रमांक देण्यात आला. या तिन्ही मॉडेलची निवड जिल्हास्तराकरीता करण्यात आली. या तंत्र प्रदर्शनीच्या यशस्वीतेकरीता आयटीआयचे शिल्पनिदेशक राजेंद्र उन्होंणे, दिपक गिरी, तुषार जैन, प्रफुल्ल कचरे, निलेश देऊळकर, राम इखार, शहजाद खान, सुशिल सरोदे, चिन्मय दहाट, सागर डांगे, वैभव केणे, प्रशांत पोच्ची, सचिन वाहणे, सचिन दुवधने, समिर भुरे, मयुरी वसुले, रूचिका डोरस, संगिता बिबेकर, दिपाली लोखंडे, रूपाली लांडे, कर्मचारी अनंत खेडकर, निलेश खंडार, मनोज पकडे, गौरव मोगरे, ऋषभ मडावी, सुरक्षारक्षक धिरज तायडे, जयेश काटोलकर, धर्मदीप राणेकर यांच्यासह प्रशिक्षणार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# दिंनदर्शिका विमोचन आणि स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहात संपन्न

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२४धा.रेल्वे** – धामणगाव रेल्वे तालुका बावणे कुणबी समाज मंडळ यांच्या दिनदर्शिका विमोचन कार्यक्रम निभोरा (बो) येथे स्थानिक बावणे कुणबी मंडळाचे संयुक्त विद्यमाने मोठ्या उत्साहात रविवार दि.२२ डिसेंबर ला संपन्न झाला. यावेळी उद्घाटक म्हणून *यवतमाळ जिल्हा बा कू समाज मंडळाचे अध्यक्ष अमोलजी सार्वे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून निंभोरा येथील मधुकरराव पिंगळे* हे व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाला *प्रमुख पाहुणे श्री गणेशराव भोयर, अनंतराव कडव, विष्णुपंतजी कांबे, भगवंतराव



ईश्वरकर, अरविंदजी जगनाडे, अरविंदजी हलमारे, जगदीशराव काटगये, समाज भूषण अण्णाजी शेंडे, विजयराव पांचबुद्धे, संजयराव बांते, रमेशराव धांडे* प्रामुख्याने उपस्थित होते. समाजातील तरुणाचे समाजकारण करण्यासोबतच राजकीय प्रतिनिधित्व करण्यावर पण लक्ष केंद्रित करावे आणि त्यासाठी समाजाने आपला म्हणून पाठीशी खंबीर पने उभे राहावे असे प्रतिपादन उद्घाटकिय सबोधणात श्री अमोलजी सारवे यांनी केले. समाजाने मुंग्यासारखे संघटन मजबूत करून त्यातून संपूर्ण सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक प्रगती सामूहिक रित्या साध्य करण्याचा प्रयत्न करावा, तसेच शेती हा आपला श्वास तर नोकरी हे साधन अंगिकारून दोन्ही आघाड्यांवर समाजाची वाटचाल गरजेची असणार आहे असे प्रतिपादन गणेशराव भोयर यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले, समाजाने 'िलळशीं' या इंग्रजी सात अक्षरा ची सामाजिक दृष्ट्या उकल करत त्या पासून बोध घेत संस्कारक्षम, आदर्श समाज घटवावा ज्याचे दायित्व प्रत्येकाने पार पाडावे असे प्रतिपादन श्री भिमरावजी मते यांनी केले, भगवंतराव इश्र्वरकर, जगदीशराव काटगये यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले, अध्यक्षीय संबोधन श्री विष्णुपंतजी कांबे यांनी केले, यावेळी पाहुण्याचे हस्ते निभोरा येथील ज्येष्ठ नागरिकांचा शाल, तुकाराम महाराजांची प्रतिमा देवून सत्कार करण्यात आला, कार्यक्रमाचे प्रास्ताविक धामणगाव तालुका बा कू स मंडळाचे अध्यक्ष श्री प्रविनभाऊ बांते यांनी केले. कार्यक्रमाचे संपूर्ण सूत्र संचालन सौ सोनुताई विशालभाऊ बांते यांनी केले, तर सूरज भाऊ गणथडे, महेश पाचबुद्धे यांनी सत्कार समारंभाचे सूत्र संचालन केले, जीवन सपाटे यांनी आभार व्यक्त केलेत, यावेळी मोठ्या संख्येने समाज बांधव कार्यक्रमाला उपस्थित होते, कार्यक्रमाचे यशस्वी ते साठी तालुका अध्यक्ष, सचिव अनुक्रमे प्रवीण बांते, सतीश मोहतूरे तसेच धामणगाव तालुका आणि निभोरा (बो.)बावणे कुणबी समाज मंडळाचे पदाधिकारी आणि संचालकांनी परिश्रम घेतले.

# खंडवा-अमरावती मार्गावर द बर्निंग कार

## खान परिवारातील पाच जण सुदैवाने बचावले

### अचानक कुत्रा आडवा आल्याने घडला अपघात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४धारणी–** इन्दौर येथून अमरावतीकडे येत असलेल्या कार–समोर अचानक कुत्रा आल्याने कार अनियंत्रणीत झाली आणि कारला अचानक भीषण आग लागल्याने प्रचंडखळबळ उडाली. सुदैवाने ग्रामस्थांनी धाव घेऊन कारमधील पाच जणांना सुरक्षित बाहेर काढल्याने मोठा अनर्थटाळला. नानाखान (५०), कुर्बानखानछोटू खान (५०), अ. मलिक (५०), आसिफ लड्डू खान (१८), सईद खान (३२) सर्व रा. इंदोर, मध्यप्रदेश असे कारमधील सुदैवाने बचावलेल्या व्यक्तींची नावे आहेत. माहितीनुसार, २२ डिसेंबर रोजी सकाळी इन्दोर येथून धारणी मार्ग अमरावती कडे येत असताना खंडवा शहराजवळ अचानक कुत्रा आडवा आल्याने कुत्र्याला वाचविण्याच्या नादात कार अनियंत्रीत झाली आणि झाडावर धडकल्याने कारच्या बोनटने पेट घेतला. जवळच असलेल्या छगांगदेवी गावातील लोकांनी तातडीने घटनास्थळावर धाव –घिऊन कारमधीलावरील नमूदै लोकांना सुरक्षित बाहेर काढल्याने – सर्व जण बचावले. परंतु, आग लागल्यानंतर कार पूर्णतः जळून खाक झाली. तसेच कारमधील कपडे, सुटकेस, एअरबॅग, मोबाइलसह इतर वस्तू सुध्दा जळून खाक झाल्या.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठून जखमींना खंडवा येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले. सर्व जखमींवर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे समजते. इंदोर येथील खान कुटूंब खाजगी कामासाठी अमरावती येथे जात असताना हा भिषण अपघात घडला होता.

# शिर्डी येथे आज आणी उद्या तृतीय महाराष्ट्र मंदिर न्यास परिषद

## अमरावती येथुन ९० हुन अधिक मंदिर प्रतीनिधी रवाना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती** –आज दि.२४ व २५ डिसेंबरला शिर्डी येथे आयोजित तृतीय महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदेला अमरावती जिल्ह्यातील मंदिर प्रतिनिधी व विश्वस्त एकवीरा देवी मंदिराच्या मागील प्रांगणातून अंबामाता व एकवीरा मातेचे आशिर्वाद घेत खाजगी बस द्वारे जयश्रीरामच्या घोषणात रवाना झाले.

महाराष्ट्र मंदिर महासंघ, मुंबई येथील श्री जिवदानी देवी संस्था, श्री ज्योतिर्लिंग भीमाशंकर देवस्थान, श्री साई पालखी निवारा आणि हिंदु जनजागृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने २४ आणि २५ डिसेंबर २०२४ या दिवशी श्री साई पालखी निवारा, नगर–मनमाड रोड, निमगांव, शिर्डी येथे तृतीय 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे'चे* आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेला संपूर्ण महाराष्ट्रभरातून १,००० हून अधिक निमंत्रित मंदिराचे विश्वस्त, प्रतिनिधी, पुरोहित, मंदिरांच्या




रक्षणासाठी लढा देणारे अधिवक्ते, अभ्यासक आदी सहभागी होणार आहेत,अमरावती जिल्ह्यातुन श्री वाघा माता संस्थान परतवाडा, श्री अंबादेवी संस्थान अमरावती, श्री एकवीरा देवी संस्थान अमरावती, श्री कार्तिक स्वामी व लक्ष्मीनारायण संस्थान अचलपुर, श्री पिंगळादेवी संस्थान नेरपिंगळाई, श्री महारुद्र हनुमान मंदिर जहागीरपुर, श्री नागेश्वर महादेव संस्थान धामंत्री, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज श्री गुरुदेव सेवा मंडळ, संत लहानुजी महाराज संस्थान टाकरखेड, संत गुलाब बाबा संस्थान टाकरखेडा मोरे, जयपुरी महाराज संस्थान निमखेड बाजार, श्रीराम मंदिर संस्थान रिद्धपूर, मारुती महाराज संस्थान मोर्शी, मारुती महाराज संस्थान हिवरखेड, नवजवान दुर्गा देवी मंदिर अमरावती, आशा मनीषा देवस्थान दर्यापूर, श्री मारुती संस्थान हातुर्णा, श्रीकृष्ण मंदिर चांदुर रेल्वे या सारख्या ९० हून अधिक मंदिरांचे विश्वस्त या मंदिर परिषदेला मोठी बस व खाजगी वाहनाने जात आहे.तसेच या परिषदेला 'हिंदु फ्रंट फॉर जस्टिस'चे प्रवक्ते आणि सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता विष्णु जैन, स्वातंत्र्यवीर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष श्री. रणजीत सावरकर, जय महाराष्ट्र या मराठी वृत्तवाहिनीचे संपादक श्री. प्रसाद काथे, मंदिर क्षेत्रात कार्यरत लेखक–अभ्यास श्री. संदीप सिंह, अष्टविनायक मंदिरांचे विश्वस्त, महाराष्ट्रातील जोतिर्लिंग देवस्थानांचे विश्वस्त, संत पिठांचे प्रतिनिधी, अन्य मंदिरांचे विश्वस्त, हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे आदी मान्यवर सहभागी होणार आहेत. या मंदिर परिषदेत मान्यवरांचे मार्गदर्शन, मंदिरांशी निगडीत विविध विषयांवर चर्चासत्रे होणार आहेत. यामध्ये 'मंदिरे सनातन धर्मप्रचाराची केंद्रे बनवणे', 'मंदिरे सरकारीकरण मुक्त करणे', 'वक्फ कायद्या'द्वारे मंदिरांच्या भूमीवर अतिक्रमण आणि मंदिरे बळकावणे यांवर उपाय, मंदिरे आणि तीर्थक्षेत्रे यांच्या परिसरात मद्य–मांस बंदी; दुर्लक्षित मंदिरांचा जीर्णोद्धार आदी विषयांवर चर्चा होणार आहे.

# लाडक्या बहिणींसाठी खुशखबर! डिसेंबरचा हप्ता केला ट्रान्सफर, आजपासून खात्यात पैसे जमा होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मुंबई**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. डिसेंबर महिन्याच्या हप्ता कधी जमा होणार या चर्चा गेल्या काही दिवसापासून सुरू आहेत. डिसेंबर महिन्याचा हप्ता देण्याची प्रक्रिया आजपासून सुरू करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. काही दिवसापूर्वीच अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हप्ता लवकरच वर्ग करण्यात येणार असल्याची माहिती दिली होती.

विधानसभा निवडणुकीवेळी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या रक्कमेत वाढ करून २१०० रुपये करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली होती. दरम्यान, आता सहावा हप्ता २१०० रुपये येणार की १५०० रुपये येणार या चर्चा सुरू होत्या. दरम्यान, आता सहावा हप्ता हा १५०० रुपये प्रमाणेच येणार असल्याचे सांगितले जात आहे.




जुलै ते नोव्हेंबरपर्यंत १५०० रुपयांप्रमाणे ७५०० रुपये महिलांच्या खात्यावर जमा करण्यात आले होते. आता आजपासून डिसेंबर महिन्याचा हप्ता वर्ग करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

नागपुरातील अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या महिन्याचा हप्ता १५०० रुपयांप्रमाणेच जमा होणार असल्याची माहिती दिली होती. डिसेंबरचा हप्ता आजपासून वर्ग करण्यात येणार आहे. एका महिन्यासाठी लागणारी रक्कम वर्ग करण्यात आली आहे. या महिन्यात दोन टप्प्यात महिलांना पैसे मिळणार आहेत. पहिल्या टप्प्यात २ कोटी ३५ लाख महिलांना १५०० रुपयांप्रमाणे जमा होणार आहेत. तर निवडणुकीआधी आलेल्या २५ लाख नवीन अर्जाची स्क्रुटिनी सुरू आहे, ती पूर्ण झाल्यानंतर या महिलांना हप्ता जमा होणार आहे.

# धनंजय मुंडे अन् वाल्मिक कराड यांचे आर्थिक संबंध अंजली दमानियांचा आरोप, सात बारा दाखवला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४बीड**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करुन हत्या करण्यात आली. या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचे जवळचे मानले जाणारे वाल्मिक कराड सूत्रधार असल्याचा आरोप करण्यात येत आहे. यामुळे आता राजकीय वर्तुळात या प्रकरणावरुन विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर टीका सुरू केल्या आहेत. दरम्यान, आता या प्रकरणावरुन सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आरोप केले आहेत.



तसेच त्यांनी ट्विट करून मुंडे आणि कराड यांच्या जमिनीचा सात बारा शेअर केला आहे.

मंत्री धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांची एकत्र जमीन असल्याचा आरोप दमानिया यांनी केला. याबाबत त्यांनी डिजिटल सात बारा शेअर केला आहे. पोस्टमध्ये अंजली दमानिया म्हणाल्या की, 'धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांची एकत्र जमीन ! हे घ्या धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांच्यातील आर्थिक सख्य किती आहे याचे धडधडीत पुरावे. कंपनी एकत्र, जमीन एकत्र , जगमित्र शुगर्स चे ६ सातबारे मी डिजिटली डाउनलोड केले . ३५५४ गुंठे जमीन (८८ एकर ३४ गुंठे) , असंही दमानिया यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे. माध्यमांना दिलेल्या प्रतिक्रियेमध्ये अंजली दमानिया म्हणाल्या, अंबेजोगाई तालुक्यातील एका गावात जमिन आहे. मी डिजीटल सात बारा डाऊनलोड केला आहे. यात ८८ एकर जमिन धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांच्या नावावर दिसत आहे. या अर्थ त्यांच आर्थिक संबंध जास्त आहेत आणि यावरुनच लोकांना हे कळेल की, हे वेगळे नाहीत. त्यांच्या कंपन्या एकत्र, जमिनी एकत्र. त्यांचे व्यवहारही एकत्र. त्यांची दहशतही एकत्र, असा आरोप दमानिया यांनी केला.

**बीडमध्ये मास्टरमाईंडच्या अटकेसाठी निघणार सर्वपक्षीय मोर्चा**

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाला १५ दिवस उलटत आले असले तरी अद्याप तीन आरोपी फरार असल्याने जिल्ह्यात संतापाची लाट निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर आज बीडमध्ये सर्वपक्षीय नेत्यांची बैठक पार पडली असून यामध्ये २८ डिसेंबर रोजी जिल्ह्यात मोर्चा काढण्याचं आयोजन करण्यात आलं आहे. हत्या प्रकरणातील मास्टरमाईंडला अटक व्हावी, ही या मोर्चाची प्रमुख मागणी असणार आहे.

# ख्रिसमसनंतर राज्यात पावसाची वारी; वर्षाअखेर वरुणराजा धो-धो बसरणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची बातमी आहे. थंडीचा कडाका वाढत असतानाच राज्यात पाऊस बरसणार असल्याची शक्यता आहे. ऐन थंडीच्या दिवसात पाऊस होणार असल्याने रब्बी पिकांचं नुकसान होईल, त्यामुळे शेतकरी चिंतेत पडलेत. वर्षाच्या अखेरच्या आठवड्यात वरूण राजा बरसणार असून हवामान विभागाकडून पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आलाय. हा अलर्ट विदर्भ, मध्य महाराष्ट्रासाठी देण्यात आलाय.

राज्यातील काही जिल्ह्यात २६ डिसेंबरपासून पाऊस होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवलाय. विदर्भासह, नंदुरबार, नाशिकमध्ये जोरदार पाऊस होईल, असा इशारा देण्यात आलाय. तर मध्य महाराष्ट्रात २६ डिसेंबरपासून जोरदार पाऊस होईल, अशी शक्यता आहे. त्याचबरोबर राज्यातील इतर भागातही पाऊस होण्याची शक्यता आहे.

ईशान्यकडील राज्यांमध्ये पावसासाठी पोषक वातावरण तयार झाल्याने राज्यात पुढील काही दिवसात पाऊस होणार असल्याचा अंदाज आहे. एकीकडे थंडीचा कडाका वाढलाय, त्यात पाऊस होण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांचं मोठं नुकसान होणार आहे. पश्चिमी प्रकोपाच्या प्रेरित परिणामातून नाताळ सणात म्हणजे २५ ते २९ डिसेंबर (बुधवार ते रविवार) पाच दिवसादरम्यान संपूर्ण महाराष्ट्रात, भाग बदलत, ढगाळ वातावरण राहुन तुरळक ठिकाणीच किरकोळ पावसाची शक्यताही सध्या जाणवू लागलीय.

# चाकूच्या धाकावर तरूणाचे अपहरण; २० तासांपासून अपहृत तरूण मिळेना; दोघे अटकेत, चारचाकी जप्त : रविनगर येथील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

चाकूच्या धाकावर अर्ध्या रात्री येथील एका निवृत्त पोलिस पाल्याचे अपहरण करण्यात आले. रविनगरस्थित पंचवटी प्ले ग्राऊंडजवळ २२ डिसेंबर रोजी रात्री ११ ते ११:३० दरम्यान ती घटना घडली. शंतनू पांडुरंग तायडे (२४, रा. रविनगर), असे अपहृत तरुणाचे नाव आहे. त्याच्या शोधासाठी राजापेठ पोलिसांनी पथके गठीत केली असून, तो अद्यापही पोलिसांना सापडलेला नाही.

याप्रकरणी राजापेठ पोलिसांनी ज्योती पांडुरंग तायडे (५४) यांच्या तक्रारीवरून आठ जणांविरुद्ध जबरी चोरी, अपहरण, दंगा व शस्त्र अधिनियमान्वये गुन्हा नोंदविला. घटनेचे गांभीर्य ओळखून भूपेंद्र ऊर्फ भूपी ठाकूर (रा. बालाजी प्लाट) व मयूर अनिल गुज्जर (रा. भुतेश्वर चौक, अमरावती) या



दोघांना अटक करण्यात आली. तर अपहृतासह उर्वरित अपहरणकर्त्यांचा शोध सुरू आहे.आरोपींकडून अपहृत तरुण शंतनू तायडे याचा मोबाइल व गुन्ह्यात वापरलेले (एमएच २७ डीयू ००१२) हेवाहन जप्त करण्यात आले. शंतनूचे वडील पोलिस खात्यातून निवृत्त झाले आहेत. तर शंतनू हा शिक्षण घेतो आहे. चार ते पाच महिन्यांपूर्वी शंतनू हा रविनगरमधील जीममध्ये जात होता. तेथे शंतनू व भूपी ठाकूर याच्या पुतण्यामध्ये वाद झाला होता. त्यावेळी शंतनू व त्याच्या आईने माफी मागून तो विषय संपविला. दरम्यान, २२ डिसेंबर रोजी रात्री ११ ते ११:३०च्या सुमारास सहा ते सात लोक काळ्या चारचाकी वाहनाने शंतनूच्या घरी आले. त्यापैकीएक जण वर आला. स्वतःची भूपी ठाकूर, अशी ओळख देत तुमच्या मुलाला आवाज द्या, असे त्याने बजावले. तुमच्या मुलाची एवढी हिंमत की माझ्या पुतण्याशी वाद विवाद केला. बघा त्याचा तुकडा पण मी दिसू देणार नाही, अशी धमकी त्याने दिली.

# तरुणांनी महापुरुषांचे विचार आत्मसात करावे: तुलसीदास झुंजुरकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४वाढोना**

अखिल विश्वाला ग्रामस्वच्छतेचा मुलमंत्र देणारे वैराग्य मूर्ती गाडगेबाबा यांचा पुण्यतिथीनिमित्त महोत्सव समिती वाढोणा वतीने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गाडगे महाराजाचे विचार आत्मसात करून प्रत्यक्षात उतरवणारे आणि गाडगेबांचा वसा सुरू ठेवणारे श्री.त्र्यंबकराव गायकवाड गेली २९ वर्षापासून अविरतपणे ग्रामस्वच्छता



करतात आणि ते अनेक पुरस्कारांनी सन्मानित आहे. त्यानिमित्ताने गावांमध्ये प्रभातफेरी काढून महापुरुषांच्या विचारांचा जागर करण्यात आला त्याप्रसंगी कार्यक्रमाला राष्ट्रीय युवा व्याख्याते श्री गुरुदेव अध्यात्म गुरूकुल गुरूकुंज मोझरी व महात्मा फुले ब्रिगेड सामाजिक संघटनेचे तालुकाध्यक्ष श्री तुलसीदास झुंजुरकार उपस्थित होते ते म्हणाले, गाडगेबाबा व तुकडोजी महाराज सर्व संत महापुरुषांनी समाजाला मार्गदर्शन करून मानवाच्या झालेल्या दशेला ला योग्य दिशा दाखविण्याच कार्य केलं. गाडगेबाबांच आणि तुकडोजी महाराजांच नातं हे घट्ट होतं बाबांच्या अंत्यसंस्काराला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी अग्नी दिला व २१ डिसेंबर १९५६ रोजी तुकडोजी महाराजांचे उद्गार निघतात सुनी खबर संत गाडगेबाबा हमको छोड गये धडक भरी छातीमे हमको पल भर तो नहीं होश रहे इतकं घट्ट नातं तुकडोजी महाराज व गाडगेबाबांच होतं आणि संपूर्ण आयुष्य समाजा करिता वेचलं.महापुरुषांचे विचार हे आजच्या पिढीने आत्मसात करून प्रत्यक्षात उतरवावे कारण देशाची धुरा ही तरूणाई च्या खांद्यावर आहे.त्यापुढे ते म्हणाले की, त्र्यंबकराव गायकवाड काकाजी चे कार्य महान आहे गाडगेबाबांचा व त्र्यंबकराव गायकवाड काकाजींचा आदर्श प्रत्येक माणसांनी घ्यावा व गावाचं नंदनवन कराव. कार्यक्रमाचे प्रास्ताविक धनराज भाऊ धोपटे यांनी केले तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पोलीस पाटील श्री रुपेश तितरे यांनी केले उपस्थित त्र्यंबकराव गायकवाड, दिपक दिडमुठे , राजु तितरे,पंकज गायकवाड,अमोल वाघाडे व सरपंच प्रशांत हुडे ,उपसरपंच विजय पाटील उपस्थित होते

# जानेवारी २०२५ पासून सुरू होणाऱ्या इग्नो अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू एस.सी.,एस.टी.वर्गवारीतील विद्यार्थ्यांना पदवी करिता नि:शुल्क प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्लीच्या अमरावती येथील अभ्यास केंद्राअंतर्गत जानेवारी, २०२५ पासून सुरू होणाया सत्राकरिता एम.ए. ( इंग्रजी, हिंदी, राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, लोकप्रशासन, ग्रामीण विकास, दूरशिक्षण, तत्वज्ञान), एम.कॉम. एम.बी.ए., (फायनान्स, ह्युमन रिसोर्स, मार्केटिंग, ऑपरेशन, सर्वीस मॅनेजमेंट प्रवेश परीक्षेशिवाय) बी.ए., बी.कॉम.सामान्य, बी.ए.टुरिझम, बी.ए.ऑनर्स (अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, लोकप्रशासन, समाजशास्त्र, इंग्रजी, हिंदी), बी.कॉम. (लेखा व वित्त), पदव्युत्तर पदविका (ग्रामीण विकास, इंटरनॅशनल बिझिनेस ऑपरेशन, ॲग्री बिझिनेस, ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट, फायनान्सीयल मॅनेजमेंट, ऑपरेशन्स मॅनेजमेंट आणि मार्केटिंग मॅनेजमेंट), डिप्लोमा (पर्यटन, एचआयव्ही




अँड फॅमिली एज्युकेशन), सर्टिफिकेट (आपत्ती व्यवस्थापन, फुड अॅन्ड न्युट्रीशन, ह्युमन राईट्स, गायडन्स, न्युट्रीशन अॅन्ड चाईल्ड केअर, कंझुमर प्रोटेक्शन, फक्शनल इंग्रजी, ग्रामीण विकास, टिचींग ऑफ इंग्लीश, टुरिझम, एचआयव्ही अँड फॅमिली एज्युकेशन) इत्यादी अभ्यासक्रमांकरिता प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली आहे.

इग्नोच्या www.ignou .ac.in वेबसाईटवरून तसेच https://ignouadmission.samarth.edu.in/ लिंकवरून अर्ज सादर करण्याची अंतिम तिथी दिनांक ३१ जानेवारी, २०२५ असून प्रवेश शुल्क इंटरनेट बँकींग/ डेबीट/क्रेडीट/एटीएम कार्डद्वारे भरता येईल. सविस्तर माहितीपुस्तिका व ऑनलाईन अर्ज कसा सादर करावा याबाबतची माहिती इग्नोचे उपरोक्त वेबसाईटवर उपलब्ध आहे. अनुसुचित जाती/ जमाती वर्गवारीतील विद्यार्थ्यांना बी.ए., बी.कॉम. बी.एस्सी. पदवी करिता नि:शुल्क प्रवेश देण्यात येत आहेत.

अधिक माहितीकरिता इच्छुकांनी इग्नोचे अभ्यासकेंद्र, मुलींचे वसतीगृहाजवळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसर येथे सकाळी ८.३० ते १०.३० या वेळात संपर्क साधावा असे डॉ.वर्षा नाठार, समन्वयक, इग्नो अभ्यासकेंद्र, अमरावती यांनी कळविले आहे.

# महाराष्ट्र निवडणुकीवर काँग्रेसने प्रश्नचिन्ह उपस्थित केले, निवडणूक आयोगाने ६६ पानांचे दिले उत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २४ मुंबई**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल समोर आल्यानंतर महाविकास आघाडीतील नेत्यांनी निवडणुकीवर शंका व्यक्त केली होती. काँग्रेसने निवडणूक आयोगाला पत्र लिहून ५० जागांबाबत प्रश्न उपस्थित केले होते. या ठिकाणी जुलै ते नोव्हेंबर या कालावधीत ५० हजार मतदार जोडल्याचा दावा त्यांनी केला होता. मात्र आता निवडणूक आयोगाने प्रत्येक जागेची चौकशी करून काँग्रेसला ६६ पानांचे सविस्तर उत्तर पाठवले असून सर्व दावे खोटे असल्याचे म्हटले आहे.

निवडणूक आयोगाने सांगितले की, ५० विधानसभेच्या जागांवर जुलै ते नोव्हेंबर ५० हजार मतदार जोडण्याचा काँग्रेसचा आरोप तथ्यात्मक स्वरुपात चुकीचा आहे. असं काहीही झालेले नाही. आम्ही प्रत्येक सीटचे तपशील तपासले आहेत. जुलै ते नोव्हेंबर या कालावधीत ५० हजार मतदारांची भर पडली, मात्र ती केवळ ६ विधानसभा जागांवर जोडली गेली.

मतदान कमी असूनही जास्त दाखवले जात असल्याचा दावा काँग्रेसने केला होता. मतदारांच्या संख्येत बदल होत आहेत, अचानक जास्त मतदान होताना दिसत आहे. याचा पुरावा देताना काँग्रेसने म्हटले होते की, संध्याकाळी ६ वाजता मतदान झाल्यानंतर मतदानाचे प्रमाण काही वेगळे असल्याचे सांगितले जाते आणि नंतर मतदान ४ ते ५ टक्क्यांनी वाढल्याचे दाखवले जाते. यावर निवडणूक आयोगानेही उत्तर दिले आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका काँग्रेसने स्वबळावर लढाव्या, स्थानिक लोकप्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांचा सूर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४चंद्रपूर**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महाविकास आघाडी कायम ठेवायची की नाही, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. काँग्रेस जिल्हाध्यक्ष माजी आमदार सुभाष धोटे यांनी याबाबत प्रदेश काँग्रेस समिती निर्णय घेईल, असे सांगितले. मात्र खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यासह बहुसंख्य पदाधिकाऱ्यांनी महापालिका व जिल्हा परिषद निवडणुका काँग्रेसने स्वबळावर लढाव्या, असा सूर आवळला आहे. विशेष म्हणजे, प्रदेश काँग्रेसनेदेखील याबाबत स्थानिक पातळीवर निर्णय घ्यावा, असे सांगितल्याची माहिती आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आगामी तीन महिन्यात होतील, असे संकेत दिले आहेत. त्यामुळे विधानसभा निवडणुकीनंतर सर्वच प्रमुख पक्ष महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. भाजपने सदस्य मोहिमेची सुरुवातही केली आहे. त्या तुलनेत काँग्रेसचे काम संथगतीने सुरू आहे. अशातच, या निवडणुकांत महाविकास आघाडी कायम ठेवायची की नाही, याबाबत काँग्रेसमध्ये विचारमंथन सुरू आहे. हा निर्णय प्रदेश काँग्रेस समितीचा आहे. मात्र, नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत बऱ्याच ठिकाणी उमेदवारीवरून आघाडीत बिघाडी झाली. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काँग्रेसने स्वतंत्र लढाव्या, असा सूर खासदार धानोरकर यांच्यासह जिल्हाध्यक्ष माजी आमदार सुभाष धोटे यांनीही आवळला आहे.

# आंतरजातीय लग्न करा; ५० हजारांचे अनुदान मिळवा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

आंतरजातीय विवाह करणाऱ्या प्रत्येक जोडप्यास शासनाकडून ५० हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. जिल्ह्यात सन २०२२-२३ या वर्षातील प्राप्त झालेल्या प्रस्तावांना मंजुरी देऊन काही जोडप्यांना अनुदान देण्यात आले आहे, तर नव्याने अर्ज केलेल्यांना अनुदानाची आजही प्रतीक्षाच करावी लागत आहे.

राज्य सरकारच्या सामाजिक न्याय विभागामार्फत १९५८ पासून आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. या समाज कल्याण विभागाकडून केली जाते.

योजनेच्या लाभासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग यापैकी एका व्यक्तीने सवर्ण हिंदू लिंगायत, जैन व शीख या व्यक्तीशी विवाह केल्यास अथवा दोन वेगवेगळ्या प्रवर्गातील व्यक्तींनी विवाह केल्यास५० हजार रुपये प्रोत्साहन अनुदान दिले जाते. या योजनेची जनजागृती केली जात आहे.विवाहित जोडप्यापैकी एक जण हा अनुसूचित जाती, अनुसूचित जामाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गापैकी असावा. जातीचा दाखला, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, वयाचा पुरावा, दोन प्रतिष्ठित व्यक्तींचे शिफारस पत्र, लग्नाचा फोटो लागतो. जातिभेद निर्मूलनासाठी ही योजना राबविली जात आहे.

### जनजागृती सुरु

आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने प्रशासनाच्या माध्यमातून जनजागृती सुरु केली आहे. त्यामुळे अनेक जण याकडे वळत आहे.



### काय आहे आंतरजातीय विवाह अनुदान योजना?

अस्पृश्यता निवारण करण्याचा एक भाग म्हणून आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने आंतरजातीय विवाह प्रोत्साहन अनुदान योजना सुरु केली आहे.

### असे मिळते अनुदान

प्रस्ताव प्राप्त होताच त्याची छाननी करून पात्र ठरलेल्यांना ५० हजार रुपयांचे अनुदान मिळते. आंतरजातीय विवाह केल्यानंतर निकषानुसार पात्र लाभार्थीची निवड करून पती-पत्नीच्या संयुक्त बँक खात्यात ५० हजारांचे अनुदान समाज कल्याण विभागाकडून वर्ग केले जाते. शासनाकडे निधीची मागणी केली जाते आहे. निधी उपलब्ध होताच जोडप्यांच्या बँक खात्यात हे अनुदान वर्ग केले जाते.

# फुटपाथवरून बाइक सवारी कराल तर दंडासह होईल गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

शहरात काही ठिकाणी फुटपाथवरून दुचाकी नेली जाते. तर बहुतांश ठिकाणी अतिक्रमितांनी फुटपाथ गिळंकृत केले आहेत. शहरातील बहुतांश रस्त्यांचे रुंदीकरण व सिमेंटीकरण झाले. मात्र, त्यावरही अतिक्रमितांनी दुतर्फा अतिक्रमण केले आहे. शहरात नावालाच फुटपाथ दृष्टीस पडतात. फुटपाथवरून दुचाकी नेली, तर दंड ठोठावला जातो.

सिग्नल जॅम झाला की, फुटपाथवरून दुचाकी राजकमल, इर्विन चौकात वा अन्य चौकात एखादवेळेस सिग्नल जॅम झाला की, दुचापावती मिळेल अन् गुन्हाही दाखल

फुटपाथ चालण्यासाठी अस्तित्वात आहे, त्याठिकाणी देखील वाहने दामटू नका. अन्यथा चलान फाडले जाईल. वाहतुकीची शिस्त न पाळता अनेक बेदरकार वाहनचालक रस्त्याच्या कडेने दुचाकी दामटतात. फुटपाथवर चालण्याचा पहिला हक्क पादचाऱ्यांचा असताना, अनेक बाइकस्वार तेथे देखील हॉर्न वाजवितात.फुटपाथवर चालणाऱ्यांचा पहिला हक्क आहे. मात्र शहरातील अनेक फुटपाथवर हातगाड्या लावल्या जातात. तर अनेक फुटपाथवर गॅरेज, दुचाकींची खरेदी विक्री केली जाते. मात्र मनपाकडून मर्यादित कारवाई केली जाते. ११ महिन्यांत फुटपाथवरून वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांना मर्यादित कारवाई झाली असली, तरी एकंदरीतच भरधाव वेगाने वाहन चालविणाऱ्या ९ हजारांहून अधिक चालकांना दंड ठोठावण्यात आला आहे.



### फुटपाथ पादचाऱ्यांसाठी


फुटपाथ हे पादचाऱ्यांना चालण्यासाठी असतात. ते वाहन दामटण्यासाठी नाही. अशा वाहनचालकांवर निरंतरपणे दंडात्मक कारवाई केली जाते.

**– कल्पना बारवकर, पोलिस उपायुक्त.**

# लाइक, शेअर, फॉरवर्ड जरा जपून; मैत्रीच्या नावावर जवळीक साधून करतात बदनाम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

आपण सोशल मीडियावर सक्रीय असाल, तर सावधान! आपण कोणतीही पोस्ट करताना खात्रीपूर्वक करा, अन्यथा एखादी चुकीची पोस्ट केलात, तर आपल्या विरुद्ध कारवाई केली जाऊ शकते.




परिणामी आपल्याला जेलची हवा सुद्धा खावी लागेल. व्हॉट्सअॅप, इन्स्टाग्राम, फेसबुक, ट्वीटर, टेलिग्राम अशा विविध सोशल मीडियावर चर्चा करताना किंवा कोणतीही पोस्ट टाकताना पोस्ट आपत्तीजनक तर नाही ना, याचा विचार करूनच ती पोस्ट टाका. अन्यथा आपण टाकलेल्या पोस्टवर कुणी आपत्ती दर्शविल्यास आपल्याविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत कारवाई होऊ शकते. परिणाम स्वरूप त्या पोस्टवरून चिघळलेल्या वादाचे गांभीर्य पाहून आपल्याला तुरुंगाची हवा देखील खावी लागू शकते. सामाजिक तेढ निर्माण होणार नाही, कुणाच्या भावना दुखावल्या जाणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे.

### मुलींनो डीपी सांभाळा

मुलींनो आपण सोशल मीडियावर सक्रीय असाल, तर आपण आपलीही काळजी घ्या. आपल्या डीपीवर समाजकंटकांचे डोळे आहेत. समाजकंटक मुलींच्या डीपी चोरून त्या फोटोंचा वापर चुकीच्या कामासाठी करतात. अश्लील फोटो किंवा व्हिडीओच्या ठिकाणी त्या फोटोचा वापर करू शकतात. अनोळखी व्यक्तीला फॉलो करू नका, आपल्याला संशय आल्यास त्या व्यक्तीला ब्लॉक करा.

# थर्टी फर्स्ट'च्या धांगडधिंग्यावर पोलिसांची राहणार करडी नजर

## जिल्ह्यात होते पार्ट्यांचे आयोजन : विनापरवाना कार्यक्रमांवर होणार कारवाई






**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

नववर्षाचे स्वागत करण्यासाठी तरुणाईला 'थर्टी फर्स्ट'चे वेध लागले आहेत. ३१ डिसेंबरला जिल्ह्यातील हॉटेल व रेसॉर्टमध्ये पार्च्छा होतात. या विनापरवाना पार्च्छा व जल्लोषावर पोलिस आणि अन्न आणि औषध प्रशासनाची (एफडीए) करडी नजर असणार आहे. एफडीएचे अधिकारी व शेकडो पोलिस या कारवाईत असणार आहेत.

ग्रामीण भागात ढाब्यांवर, जंगलात,शेतात रात्रीपर्यंत पार्ट्या करणाऱ्यांवर करडी नजर राहणार आहे. जिल्ह्यातील आठही तालुक्यात मावळत्या वर्षाचा जल्लोष व येणाऱ्या वर्षाचे स्वागत म्हणून मोठ्या संख्येत पार्च्छा होतात. पार्ट्यामध्ये तरुणाई राहते. सध्या सोशल मीडियावर नववर्षाच्या स्वागताच्या तयारीबाबत चर्चा सुरू झाली आहे. तरुणाईकडून हॉटेल आणि रेस्टॉरंटमध्ये पार्ट्यांचे नियोजन केले जात आहे. ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर शहर व ग्रामीणपरिसरातील हॉटेल्स सजले आहेत. मोठ्या हॉटेलपासून साध्या हॉटेल्सनाही आकर्षक रोषणाई केली आहे. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी काही हॉटेल चालकांनी डीजे, लाइव्ह गाण्यांचे शो आयोजित केले आहेत. तरुण-तरुणींना विशेष सवलत दिली जात आहे.या पार्ट्यांवर अन्न आणि औषध प्रशासनाची करडी नजर असणार आहे. फूड सेफ्टी ऑफिसरकडून हॉटेल्सची तपासणी केली जाणार असूनअन्नपदार्थांचे नमुने प्रयोगशाळेत पाठविले जाणार आहेत. कमी दर्जाचे, बनावट आणि असुरक्षित अन्नपदार्थ आढळल्यास त्या हॉटेल चालकांवर कारवाई केली जाणार आहे.

### व्यावसायिकांकडून आगाऊ नोंदणी

हॉटेलमध्ये कॉलेजचे विद्यार्थी, आयटीमध्ये काम करणाऱ्या तरुण- तरुणी फोन करून विविध ऑफर्सची माहिती घेत आहेत.ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी हॉटेल्सने मेन्यूवर सवलती व विशेष पॅकेजची व्यवस्था केली आहे.

३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर हॉटेल, टेंन्ट मालकांनी जादा कर्मचारी नेमावे, क्षमतेपेक्षा जादा नागरिकांना प्रवेश देऊ नये. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने तेथे येणाऱ्या प्रत्येकाचे आधार कार्ड क्रमांक, गाडी क्रमांक यांची नोंद ठेवण्याचे काम करण्याची गरज आहे. नववर्षाचा जल्लोष करा परंतु कायद्यात राहून सर्व कामे शांततेत करा.

**विशाल आनंद**
**ग्रामीण पोलिस अधीक्षक**

### पार्टी करताय? परवानगी घेतली का?

अनेक जण नववर्षाच्या जय्यत तयारीलाही लागले आहेत. अनेकांनी हॉटेल, ढाबे बुकिंगही केले आहेत, तर अनेकांनी मोकळ्या मैदानात, सार्वजनिक ठिकाणी ध्वनिक्षेपक लावून नयीन वर्षाचे अल्लोषात स्वागत करण्याचे नियोजन केले आहे.

मात्र, सार्वजनिक ठिकाणी, मोकळ्या जागेत पार्टी करण्यासाठी पोलिसांची परवानगी आवश्यक असून, विनापर-वानगी पाटा केल्यास त्यांच्यावर कारवाई होणार आहे.

# अमित शहा यांनी तात्काळ माफी मागावी आणि गृहमंत्री पदाचा राजीनामा द्यावा - कॉंग्रेस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती –**

भारतीय राज्यघटना स्विकारल्याच्या ७५ व्या वर्धापन दिनाच्या ऐतिहासिक प्रसंगी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते श्री राहुल गांधी आणि विरोधी पक्षनेते राज्यसभेत श्री मल्लिकार्जुन खर्गे यांनी लोकसभेच्या अध्यक्षांना पत्र लिहिले होते. संविधानावर चर्चा करण्याची विनंती. हा प्रस्ताव मान्य करण्यात आला, आणि भारताच्या संविधानाचा अमृतमहोत्सव निमित्त संसदेत चर्चा सुरू झाली. तथापी, संविधानावरील गंभीर आणि महत्त्वपूर्ण चर्चा म्हणून सुरू झालेल्या चर्चेला वळण मिळाले भाजपने राजकीय संधीसाधूपणाचे लांच्छनास्पद प्रदर्शन केले. प्रतिष्ठा राखण्याऐवजी विरोधी पक्षनेत्यांची बदनामी आणि अपमान करण्यासाठी भाजपने व्यासपीठाचा गैरवापर केला. अगदी सर्वात वाईट म्हणजे, केंद्रीय गृहमंत्र्यांनी राज्यघटनेचे मूलतत्त्व आणि त्याचे सार यांना अपमानित केले आहे .



भारताच्या संविधानाचा अमृतमहोत्सव राज्यसभेत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये संविधानावर चर्चा सुरू असताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा भाषणं देत असताना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी धक्कादायक टिप्पणी- अभी एक फॅशन हो गया है – आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर. ईतना नाम अगर भगवान का लिया होता तो सात जन्मों तक स्वर्ग मिल जाता (आंबेडकर वारंवार म्हणण्याची फॅशन झाली आहे. जर ते देवाचे नाव इतक्या वेळा घेतले की त्यांनी सात जन्मांसाठी स्वर्ग सुरक्षित केला असता )-होते. हा केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान नाही तर थेट भारताच्या आत्म्याचा अपमान आहे.या भयावह वातावरण नंतरही भाजप आणि त्यांच्या नेतृत्वाने कोणताही पश्चाताप दाखवला नाही पश्चात्ताप त्याऐवजी, ते लाखो भारतीयांना झालेल्या दुखापतींना आणखी वाढवत आहेत. अशा विधानांचा बचाव करून, त्यांच्या गंभीर घटनाविरोधी आणि दलितविरोधी गोष्टींचा पर्दाफाश केला. भाजप ची मानसिकता ही घटना भारतीय राज्यघटना विरोधी आहे हे मागील १० वर्ष पासून दिसून येत आहे. हे दिसत असताना आरएसएसची ऐतिहासिक आणि वैचारिक भूमिका प्रतिबिंबित करते, ज्याने भारतीय राज्यघटनेला सुरुवातीपासूनच विरोध केला आहे. आरएसएसने उघडपणे अपमान केला आहे . राज्यघटना, त्यातील एका अग्रगण्य व्यक्तीने भारतीय काहीही नसलेले असे वर्णन केले आहे. आरएसएसची वैचारिक पसंती मनुस्मृतीत आहे, जो प्रतिगामी आणि जातीयवादी मजकूर आहे.

भारतातील उपेक्षित समुदायांबद्दलचा द्वेष निर्माण करते हे भाजप तत्व वेळोवेळी दिसून येते. भाजप दलितविरोधी, आरक्षणविरोधी भूमिका, समानतेच्या घटनात्मक तत्त्वांचे उल्लंघन करते आणि न्याय अनुसूचित जाती आणि उपेक्षितांच्या उन्नतीसाठी त्यांचे पोकळ वक्तव्य त्याच बरोबर त्यांची कृतींद्वारे विरोधी आहे , हे सर्वच व्यवहारावरून दिसून येते.

मोदी सरकार शोषितांना सशक्त करण्याऐवजी त्यांना दुबळे करत आहे मागील दहा वर्षांच्या त्यांच्या कामकाजावर दिसून येत आहे. देशातील विशिष्ट समाज घटकाला लक्ष करून त्यांच्यावर हल्ला करणे. हे भाजपने धोरण बनले आहे. आम्ही सर्व भारतीय या कृत्यांचा निःसंदिग्धपणे निषेध करतो. संविधानाच्या मूल्यांचे आणि न्याय्य आणि सर्वसमावेशक दृष्टिकोनाचे रक्षण करण्यासाठी आम्ही स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी साकारलेला पवित्र अशा भारतीय राज्यघटनेच्या रक्षणासाठी आम्ही एकत्रपणे लढू, आम्ही कॉंग्रेस पक्ष्याच्या वतीने अमित शहा यांनी तत्काळ माफी मागावी, आणि गृहमंत्री पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी आम्ही करतो. या प्रसंगी पत्रकार परिषदेला खासदार बळवंत वानखडे, माजी मंत्री यशोमतीताई ठाकूर, माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख, दिलीप एडतकर, किशोर बोरकर, बबलू शेखावत, जयश्री वानखडे, प्रवीण मनोहर, पंकज मेश्राम, हरिभाऊ मोहोड, हे उपस्थित होते.

# बच्चू कडूंनी घेतली ना गडकरी यांची भेट : अपूर्ण कामावर चर्चा, फिनले मिल, बैतूल, परतवाडा अमरावती महामार्ग, चांदूरबाजार बायपास , पूलांचे नूतनीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि२४ अचलपूर**

आपल्या कार्यकाळात झालेल्या विविध विकासात्मक कामातील रखडलेल्या कामासंदर्भात माजी आमदार बच्चू कडू यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची नागपूर येथे भेट घेतली. अचलपूर येथील फिनले मील, परतवाडा अमरावती महामार्ग, पूलांचे नूतनीकरण, बहिरम बैतूल मार्ग व इतरही विकासात्मक बाबीवर चर्चा झाली. तात्काळ कामे केल्या जाणार असल्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले

अचलपूर विधानसभा मतदारसंघात कोट्यवधी रुपयांची विकासकामे माजी आमदार बच्चू कडू यांच्या कार्यकाळात करण्यात आली. त्याच कामांमध्ये काही कामे अपूर्ण असल्याने त्या संदर्भात माजी आमदार बच्चू कडू यांनी नागपूर येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन संबंधित कामे पूर्ण करण्यासंदर्भात चर्चा वजा विनंती केली. गडकरींनी सुद्धा या संपूर्ण कामांची माहिती घेत लवकरच ती कामे मार्गे लावणार असल्याचे सांगणे अस्वस्थ केले.



परतवाडा अमरावती मार्ग, पूलांचे कामजिल्ह्यात सर्वाधिक वर्दळीचा परतवाडा ते अमरावती मार्ग आहे दिवसभर शेकडो वाहने धावतात परंतु विविध अडथळ्यांनी तो आतापर्यंत रखडला त्यासाठी सतत आपलं कार्यकाळात बच्चू कडू यांनी प्रयत्न केले राहिलेला हा प्रकल्प पूर्ण करण्याची विनंती त्यांनी नितीन गडकरी यांना केली त्यासोबतच परतवाडा ते चांदूरबाजार मार्गावरील कुरळ पूर्ण व तळेगाव मोहना येथील पुलाचे काम राहिले असून उर्वरित रस्त्याचे चौपदरीकरण झाले दोन्ही पुलाची काम प्राधान्याने करण्यात यावी. बळीराम बैतूल मार्गावरील अर्धवट राहिलेला मार्ग पूर्ण करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

### फीनले मील,चांदूरबाजार बायपास

अचलपूर येथील फीनले मिल गेल्या काही वर्षापासून बंद पडून आहे शेकडो कामगारांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली आहे. अनेकदा यासंदर्भात निवेदने चर्चा आंदोलन बैठका सुद्धा झाल्या परंतु तोडगा निघत नाही त्या संदर्भात नफ्यात असलेले या मिलला पुनर्जीवन देण्या सोबत रोजगाराचा रखडलेला मार्ग सुरू करण्याची मागणी करण्यात आली. त्याचप्रमाणे चांदूरबाजार परतवाडा शहरासाठी असलेला बायपास ला सुद्धा तात्काळ प्राधान्य देण्याची मागणी करण्यात आली.

### शकुंतला रेल्वे सुरू करा

इंग्रज कालीन शकुंतला रेल्वे इतिहास जमा होण्यापूर्वी तिचे पुनर्जीवन करून गोरगरिबांसाठी महत्त्वाची असलेली ही रेल्वे सुरू करण्याची मागणी सुद्धा बच्चू कडू यांनी यावेळी केली कार्यकाळातील राहिलेले अनेक विषय पूर्ण करण्याची धावपळ कायम ठेवीत विकासात्मक कामात राजकारण नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी ना गडकरी यांची भेट घेऊन चांदूरबाजार अचलपूर तालुक्यातील समस्या मांडल्या.